आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, १५ फेब्रुवारी २०२४
किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - १७७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 15 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | • YEAR-03 • ISSUE-177 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-05


# सरकारने मनोज जरांगे पाटलांना फसवले

## नाना पटोले : ...तर उपोषणाची वेळ का आली?

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : मराठा आरक्षणासाठी लढा देत असलेले मनोज जरांगे पाटील यांची सरकारने फसवणूक केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाच्या सर्व मागण्या मान्य केल्या आहेत, असे नवी मुंबईत जरांगे यांच्या लाखो कार्यकर्त्यांसमोर जाहीर केले. दिलेला शब्द आपण पाळला असेही मुख्यमंत्री म्हणाले. जरांगे पाटील यांनी केलेल्या सर्व मागण्या मान्य झाल्या तर मग पुन्हा उपोषण करण्याची वेळ त्यांच्यावर का आली? सरकारने मराठा समाजाला फसवले की ओबीसी समाजाला, असा सवाल आम्ही त्याचवेळी केला होता याची आठवण महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी बुधवारी पुन्हा करून दिली.**

टिळक भवन मध्ये पत्रकार परिषदेला संबोधित करताना नाना पटोले पुढे म्हणाले की, राज्यसभेच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाला आयात केलेल्या लोकांना उमेदवारी द्यावी लागली. जगातील सर्वात मोठा पक्ष व ‘विश्वगुरु’ असे नेतृत्व असल्याच्या वल्गणा करणाऱ्यांकडे राज्यसभेसाठी उमेदवार नसावा यातूनच भाजपा हा हवा भरलेला फुगा आहे तो कधीही फुटू शकतो हे दिसते. आयारामांना उमेदवारी आणि निष्ठावान कार्यकर्त्यांना डावलणे हीच भाजपाची पद्धत आहे. राज्यसभेची उमेदवारी आयात केलेल्या लोकांना देऊन कार्यकर्त्यांनी केवळ सतरंज्याच उचलाव्या हा संदेश भाजपाने दिलेला आहे. पक्ष वाढवण्यासाठी जे कार्यकर्ते आयुष्यभर मेहनत करतात त्यांना भाजपा संधी देत नाही. भिती दाखवून, दरोडे टाकून दुसऱ्या पक्षातील लोकांना भाजपात घेणे, दुसऱ्यांचे पक्ष फोडणे, चोरणे हेच काम भाजपा सध्या करत आहे. भाजपामध्ये नेतेच नाहीत, कालपर्यंत ज्यांना ते ‘डिलर’ म्हणत होते त्यांनाच आता ‘लिडर’ म्हणण्याची वेळ भाजपावर आली आहे, अशी टीका नाना पटोले यांनी केली आहे.

**मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती गंभीर :** मंगळवारपासून मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती ढासळण्यास सुरुवात झाली . या पार्श्वभूमीवर खासगी डॉक्टरांचे एक पथक आंदोलनस्थळी दाखल झाले होते . यामध्ये छत्रपती संभाजीनगरमधील रुग्णालयात जरांगे यांच्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरांचा समावेश होता . या डॉक्टरांनी बुधवारी सकाळी मनोज जरांगे यांना उपचार घेण्याची विनंती केली . मात्र, जरांगे यांनी डॉक्टरांना माघारी धाडले होते . अखेर काही जवळचे सहकारी आणि नारायण गडाचे महंत शिवाजी महाराज यांनी समजवल्यानंतर मनोज जरांगे पाटील वैद्यकीय उपचार घेण्यास तयार झाले आहेत . डॉक्टरांच्या पथकाने त्यांच्यावर तातडीने उपचार सुरु केले असून त्यांना सलाईन लावली आहे . तसेच त्यांना व्हायरल इन्फेक्शन टाळण्यासाठी इंजेक्शन देण्यात आले होते . मनोज जरांगे यांचा रक्तदाब आणि ऑक्सिजनची पातळीही डॉक्टरांनी तपासली आहे . पुढील काही काळ डॉक्टरांचे पथक त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून राहतील . मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी मराठा क्रांती मोर्चाकडून बुधवारी बंदची हाक देण्यात आली होती . या पार्श्वभूमीवर आळंदी, पुरंदर, बारामती, सोलापूर, मनमाड याठिकाणी उत्स्फुर्त बंद पाळण्यात आला . शहरी भागात बंदला चांगला पाठिंबा मिळाला . तर ग्रामीण भागात बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला .

# निळवंडेस अडथळा आणणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करा

## उच्च न्यायालय

आधुनिक केसरी न्यूज

**किसन पवार**

**कोपरगाव :** राज्य सरकारचा जलसंपदा विभाग निळवंडे प्रकल्पाच्या कामावर शेतकरी व लाभार्थ्यांसाठी मोठा खर्च करत आहे. काही लोक विविध असंबद्ध कारणे शोधून सदर प्रकल्प बंद करण्यासाठी विविध क्लुप्त्या शोधून आंदोलने करत आहेत. या प्रकल्पाच्या गतीत अडथळा आणण्याचे नसते उद्योग करत असून अशा विनाकारण प्रगतीत अडथळे आणणाऱ्या अपप्रवृत्तीवर मग ती कितीही मोठ्या पदावर कार्यरत असो कठोर कारवाई करावी, असा आदेश उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने जलसंपदा विभागास दिला. राजकीय नाटक कंपन्यांवर या निर्णयाचा मोठा चाप बसणार असल्याचे बोलले जात आहे. या निर्णयाचे निळवंडे कालवा कृती समितीने जोरदार स्वागत केले आहे. निळवंडे कालवा कृती समितीचे संस्थापक नानासाहेब जवरे व विक्रांत काले यांनी उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांच्या सहकार्याने ५३ वर्ष रखडलेल्या निळवंडे प्रकल्प व कालव्यांचे काम मार्गी लावण्यासाठी सप्टेंबर सन-२०१६ साली जनहित याचिका (क्रं.१३३/२०१६) दाखल करून हा प्रश्न मार्गी लावला आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशाने दि.१४ ऑक्टोबर ते २३ डिसेंबर २०२३ दरम्यान डाव्या कालव्यांची दुसरी चाचणी दोन टप्प्यात संपन्न झाली असून त्यास अडीच टी.एम.सी.पाणी खर्ची पडले आहे. तर उजवा कालव्यास १८ जानेवारी रोजी जलसंपदा विभागाचे उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाचे न्या. रवींद्र घुगे व न्या.वाय.जी. खोब्रागडे यांनी चांगलेच कान उपटल्यावर धूळखात पडलेल्या उजव्या कालव्यांना घाईघाईने दि.२२ जानेवारी रोजी दीड टी.एम.सी. सोडले पाणी सोडले आहे. त्यात या आदेशाने जलसंपदा विभागाची चांगलीच तारांबळ उडाली आहे. यात धुमाळवाडी अकोले येथील कालवा खोदाई सदोष असताना त्यांनी पाणी सोडल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे सदर पाणी ऐन वेळी आठ दिवस बंद करण्याची नामुष्की पत्करावी लागली होती. त्याची तत्काळ दुरुस्ती झाल्यावर पुन्हा एकदा पाणी सोडले असून सदर पाणी कानडगाव (ता.राहुरी) ओलांडून पुढे गेले आहे. या प्रकरणी कालवा कृती समितीचे विधीज्ञ अजित काळे यांनी दि.१८ जानेवारी रोजी अकोले तालुक्यात वारंवार आंदोलने करून सदर काम बंद करण्याचे षडयंत्र आखले जात असून यात मोठ्या राजकीय शक्ती गुंतल्या असल्याचे सांगून उच्च न्यायालयाचे लक्ष वेधून घेतले होते व या प्रकल्पाचे अंदाजपत्रक ०७.९३ कोटींवरून तब्बल ०५ हजार १३८ कोटींवर गेल्याचे निदर्शनास आणून दिले होते. या प्रकल्पावर प्रचंड खर्च होऊनही पहिल्याच चाचणीत मोठी गळती झाली होती. त्यावर न्यायालयाने ताशेरे ओढले आहे. त्यासाठी नागपूर येथील राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था यांनी,'स्ट्रक्चरल ऑडिट' करून डाव्या कालव्यावरील गळतीचा शोध घेण्यास बजावले आहे व त्याचा अहवाल दाखल करण्यास फर्मावले आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाची भंबेरी उडाली आहे. दरम्यान निळवंडे कालवे पूर्ण करण्यासाठी जलसंपदा विभागास उच्च न्यायालयाने सहा मुदतवाढी देऊनही कालवे वेळेत पूर्ण करत नसल्याचे दिसून आल्यावर दि.१३ जुलै २०२३ रोजी आर्थिक खर्चास प्रतिबंध केला होता त्यास आता परवानगी दिली आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाने समाधान व्यक्त केले आहे. मात्र आगामी काळात या प्रकल्पास अडथळा आणण्याचे राजकीय नेत्यांचे तब्बल ५३ वर्षानंतर धुळीस मिळविण्यास कालवा कृती समितीस यश आले आहे.वर्तमानात ज्या नेत्यांनी व त्यांच्या पित्यांनी या प्रकल्पास ५३ वर्ष अडथळे आणले त्यांनीच निर्लज्जपणे जलपूजन करून, 'जलनायक', 'जलदुत' म्हणण्याचा अश्लाघ्यपणा केला असून त्याने लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांत संताप व्यक्त होत आहे. तर उच्च न्यायालयातील न्याय देणारे न्या. रवींद्र घुगे व न्या.वाय.जी. खोब्रागडे, ॲड. अजित काळे आदींचे निळवंडे लाभक्षेत्रातील दुष्काळी शेतकऱ्यांनी जोरदार स्वागत केले आहे. दरम्यान या लढाईत निळवंडे कालवा कृती समितीचे याचिकाकर्ते नानासाहेब जवरे व विक्रांत काले यांचे व या समितीस विना मोबदला सहाय्य करणारे विधीज्ञ अजित काळे यांचे निर्विवाद योगदान दिले असल्याची जनतेला माहिती आहे. मात्र पैसा आणि सत्ता या जोरावर सहकार, साखर, दारू सम्राट यांनी हे श्रेय घेण्याची केविलवाणी धडपड सुरु ठेवली असून शेतकऱ्यांना या विघ्नसंतोषी नेत्यांचे योगदान माहिती असल्याचे समितीने आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे. या निर्णयाचे कालवा कृती समितीचे अध्यक्ष रुपेंद्र काले, कार्याध्यक्ष मच्छीन्द्र दिघे, गंगाधर रहाणे, उपाध्यक्ष संजय गुंजाळ, सोन्याबापू उऱ्हे सर, संघटक नानासाहेब गाढवे, सचिव कैलास गव्हाणे, रमेश दिघे, बाबासाहेब गव्हाणे, कौसर सय्यद, भाऊसाहेब गव्हाणे, रावसाहेब मासाळ, आप्पासाहेब कोल्हे, सोमनाथ दरंदले, अशोक गांडोळे, वाल्मिक नेहे, वसंत थोरात, विजय थोरात, तानाजी शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे, बंडू देशमुख, दौलत दिघे, सचिन मोमले आदींनी अभिनंदन केले आहे.

# वडेट्टीवार यांच्या पाठपुराव्याला यश


### शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासिता विद्यार्थ्यांना मिळणार दरमहा १८ हजार रुपये विद्यावेतन

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्रातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील आंतरवासिता (इंटर्न) विद्यार्थ्यांचे विद्यावेतन दरमहा 18 हजार रुपये करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासिता विद्यार्थ्यांना भरीव विद्यावेतन मिळावे, यासाठी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी आग्रही मागणीही केली होती. त्यांच्या मागणीला यश आले आहे. विद्यावेतनाच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशन दरम्यान वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे बैठक घेण्यात आली होती. ही बैठक श्री. वडेट्टीवार यांच्या मागणीमुळे घेण्यात आली होती. या बैठकीत केलेल्या मागणीला यश मिळाले आहे. कर्नाटक, आसाम, पश्चिम बंगाल, ओडिसा, दिल्ली , छत्तीसगड या राज्यांमध्ये मिळणाऱ्या विद्यावेतनाच्या तुलनेत महाराष्ट्रात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील आंतरवासिता (इंटर्न) विद्यार्थ्यांचे विद्यावेतन तुलनेने अत्यल्प आहे. याकडे वडेट्टीवार यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांचे लक्ष वेधले होते. यामुळे अनेक वर्षांपासूनचा आंतरवासिता विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनाचा प्रश्न मार्गी लागला आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

कोण आपण .? मी आपल्याला काही मदत करू शकतो का ? क्षणभर ती माऊली स्तब्ध होती. मग म्हणाली, ' असं परक्यासारखं नको बोलूस रे. मी तुझी आईच आहे. एका आईनं तुला जन्म दिला. मी तुला शब्द दिले, भाषा दिली. शेतामध्ये धान्य पेरतो. नंतर ते अनेक पटींनी परत मिळतं. तशी लहानपणापासून तुझ्या अंतरात मी शब्दांची पेरणी केली. ती भाषेच्या रूपाने तुझ्या लेखणीतून, वाणीतून प्रकट झाली. आता तरी लक्षात आलं ना की मी कोण आहे ते ! ' होय माते, तू तर माझी माय. माय मराठी. मला लक्षातच आलं नाही आधी. मला क्षमा कर.' ' असू दे लेकरा. चालायचंच. तुझा काही दोष नाही त्यात. '
पण माते मला सांग, तू आता इथे कशी काय ? अरे तुझ्या लक्षात नाही आलं का ? दोन तीन दिवस इथे साहित्य संमेलन होतं ना...! म्हणून आले होते खूप आशेने !
' पण माते मला सांग तुझी ही अशी अवस्था कशानं झालं ? तुझ्या अंगावरचा हा भरजरी शालू कशानं फाटला ? माये, तू तर श्रीमंत, धनवान. तुला कशाचीच कमी नव्हती. माझ्या ज्ञानोबा माउलींना तर तुझा केवढा अभिमान ! संस्कृतमधील गीता त्यांनी तुझ्यारूपाने सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवली. ज्ञानोबा माऊली म्हणाली, ' माझा मऱ्हाटीचा बोलू कौतुके, परी अमृतातेही पैजा जिंके. ' खरंच माऊलींच्या शब्दाशब्दातून अमृताचे थेंब ठिबकत होते. म्हणूनच माऊलींनी तो वर्णन करण्यासाठी ज्ञानेश्वरी नंतर ' अमृतानुभव ' लिहिला. माऊलींनी सांगितलेल्या गीतेवरील टीका ' ज्ञानेश्वरी ' ऐकताना श्रोत्यांनी जे श्रवणसुख अनुभवलं त्याला तोड नाही. उपमा नाही. सर्वांगाचे जणू कान झाले. पुढे तुकोबांनी अभंग लिहिले. त्याची गाथा झाली. तुकोबांच्या मनाला भिडणाऱ्या तरल अभंगांनी इंद्रायणीसारखंच मराठी मनाला भिजवून चिंब केलं. समर्थ रामदासांनी दासबोध सांगितला. मनाचे श्लोक सांगून मनाला बोध केला. शिवरायांना ' जाणता राजा, श्रीमंत योगी, सामर्थ्यवंत, वरदवंत, कीर्तिवंत....' अशी विविध सार्थ विशेषणे लावून तुझ्या श्रीमंतीचा प्रत्यय आणून दिला.






## आनंदी पहाट

### सहजीवनात संवादातून आनंद प्राप्ती

आधुनिक केसरी

एका व्यक्तीसारखी दुसरी व्यक्ती आपल्याला शोधूनही सापडत नाही. एखाद-दुसऱ्या गोष्टींमध्ये कदाचित साम्य असेल, पण व्यक्तिमत्वातील अगदी तंतोतंत सारखेपणा कधीच दिसून येत नाही. व्यक्ती तितक्या प्रकृती असं नेहमीच आपण सर्वत्र अनुभवत असतो. प्रत्येक व्यक्तीच्या विचारांतच फरक असतो. अर्थात तो तसा आचार आणि संस्कारांत देखील असतो. एखाद्या व्यक्तीच्या आवडीनिवडी, सवयी, बोलण्याच्या सवयी, लकबी अगदी सगळ्यांतच भिन्नता असते. ह्या भिन्नतेमुळे अनेकदा आपापसातील विचार, आचार आणि व्यवहारात कमी अधिक प्रमाणांत समस्या भेडसावत असतात. ह्यासाठी एकमेकांचं ताळतंत्र, थोडं का होईना पण सांभाळायला लागतं. सर्वप्रथम संवादाचं महत्व समजून घेण्याची आणि शास्त्र अवगत करण्याची आवश्यकता असते. ह्या संवादात व्यक्तिगत विचार समाविष्ट झालेले असतात. खरं तर ते विचारच अधिक महत्वाचे असतात. संवादाचं सुख ही ज्याची त्यानी अनुभूती घेण्याची बाब असते. स्वतःच भावनिक, मानसिक, आंतरिक आणि शारीरिक पातळीवर प्रत्येक संवाद घडवून आणायचा असतो. ह्या सर्वच बाबींचं समीकरण कसं मांडायचं हे ज्याला माहिती होतं, त्याला संवादात पूर्णपणे सहभागी होऊन त्या संवादाचं सुख प्राप्त करून घेता येतं. स्वतःचे विचार व्यक्त करण्यासाठी संवादासारखं प्रभावी माध्यम दुसरं कोणतंही नसतं. अनेकदा दोन व्यक्ती एकत्र येऊन संवादाच्या माध्यमातून आपापले विचार मांडतात जरूर, पण त्या संवादाचा हेतू तिसऱ्या व्यक्तीच्या निंदेचा असेल, तर केवळ अशा विचारांमुळे नकारात्मक वातावरणाचीच निर्मिती होत असल्याचं दिसून येतं. संवादाचं सुख प्राप्त करण्यासाठी सकारात्मक विचार, आचार आणि संस्कार अंगीकारण्याचीच गरज अधिक असते. संसारामध्ये अंतर्मनावरील संस्कार महत्वाचे असतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### द्वार ते मोक्षाचे | जाण जीवा ||

लावावा मोगरा | रूजावी पुण्याई ||
फुलावी ज्ञानाई | काळजात ||१||
भक्तीच्या रसाचे | करूनी शिंपण ||
चिंतनी चिंतन | विठोबाचे ||२||
अभंग हे रूप अभंगचि व्हावे ||
अभंगात गावे | आत्माराम ||३||
खेळावी फुगडी | वारीत विठुच्या ||
निष्काम कर्माच्या | रिंगणात ||
त्यागु नको कधी | भोग प्रारब्धाचे ||
द्वार ते मोक्षाचे | जाण जीवा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरूपण

आधुनिक केसरी

वोलांडा आणी वळ ।पोटसुळाची तळमळ ।
आर्धशिसी उठे कपाळ ।या नांव आध्यात्मिक ॥२३॥
दुःखे माज आणि मान ।पुष्ठी ग्रीवा आणि वदन ।
अस्तिसांदे दुःखती जाण ।या नांव आध्यात्मिक ॥२४॥
कुळिक तरळ कामिणी ।मुरमा सुंठरें माळिणी ।
विदेसीं लागलें पाणी ।या नांव आध्यात्मिक ॥२५॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

पञ्चकोश यह धर्म है,
कोश अच्छादित ज्ञान ।
आप कोश से अलग है, चेत धर्म
विज्ञान ।।५६।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल
सप्तम अध्याय) ०२/०७/५६
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
या पंचकोशांच्या धर्मामुळे आत्म्याचे ज्ञान दबले गेले आहे. आत्मा या कोशांपासून वेगळा आहे. ब्रह्मविद्या विज्ञानाद्वारे तो आपल्या चेतन स्वरूपाला जाणतो.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली

पुष्प ६५वे

आधुनिक केसरी

एप्रिल महिना सन १८९७ चा ।
दुष्काळ काळ''सरण्याचा।
झाला होता उत्सव रामनवमीचा ।
बहुत मंडळी होती गोंदवल्यास मुक्कामी ।। १
।। एके दिनी सकाळी ।जमली भजनास मंडळी
।रामनामी लागली ब्रह्मानंदी टाळी ।
श्रीमहाराज तल्लीन भजनात ।।२।।
भजन सुरू झाले- त्रेपन्न वर्षे भूमीभार ।
आता पाहू आपले घर ।।
देहमर्यादा सरली। मागे भक्ति करा भली।।
तुम्हा सांगितल्या खुणा ।विसरू देऊ नका मना
।। दीन दास आनंदला ।राम बोलवितो मला ।।
श्रीमहाराज भजन संपवत म्हणाले ।कसे
वागावे तुम्ही, हे सांगितले ।मन रामनामी गुंतले
।की होईल ठीक सारे ।। ३।।
आम्ही नैमिष्यारण्यासी जातो, म्हणाले ।शब्द
त्यांचे हे ऐकले ।बावरून सारे गेले ।गोंधळ
उडाला एकची ।।३।। जो तो घाबरून गेला ।
मनाचा ठाव सोडला ।
सुचेना काही कुणाला ।महाराजांच्या निर्णयाने
।। ४ ।। रामाच्या मूर्ती समोर महाराज उभे
राहिले। डोळे भरूनी रामराया पाहिले ।मग
बोलले ।सांभाळ सर्वांना, मज निरोप दे ।। ५ ।।
जनसमुदाय लोटला ।महाराजांना निरोप
देण्याला ।अश्रूंचा महापूर वाहू लागला ।
साऱ्यांच्या डोळ्यातुनी ।।६।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## अनुसंधानासाठी सतत नामस्मरण करावे

आधुनिक केसरी

नामस्मरण हे प्रपंचाकरिता, म्हणजे तो चांगला व्हावा म्हणून नाही, तर प्रपंचाची आसक्ती कमी करण्यासाठी आहे. तरी पण त्याने प्रपंच बिघडणार नाही. जे होईल ते आपल्या बऱ्याकरिता आहे असे मानून परमात्म्यावर विश्वास ठेवून राहावे. एक गृहस्थ मला भेटले तेव्हा म्हणाले, '' मी रिकाम्या वेळेत नामस्मरण करतो. '' त्यावर मी म्हटले, '' साऱ्या जन्मात महत्त्वाचा आणि सार्थकी लागलेला वेळ असेल तर तो हाच; त्याला तुम्ही रिकामा वेळ कसा म्हणता ? '' पुढे ते म्हणाले, '' प्रारब्धाचे भोग काही केल्या टळत नाहीत, ते भोगावेच लागतात, असे सर्व संत सांगतात. हे जर खरे, तर प्रारब्धाचे भोग आपण भोगत असताना त्यामध्ये भगवंताच्या स्मरणाची काय गरज आहे ? '' खरोखर हा प्रश्न अगदी बरोबर आहे. आपल्या कर्माचे भोग आपल्यालाच भोगावे लागतात हे खरे. पण भोग आले की, आपल्या मनाला चैन पडत नाही, तिथे मनाला भगवंताच्या स्मरणात गुंतवून ठेवले की आपले समाधान टिकते. आपल्या सध्याच्या अवस्थेमध्ये, ' भगवंताच्या इच्छेने घडायचे ते घडते ' असे मानणे, किंवा ' भगवंत चांगले करील' असा विश्वास ठेवून वागणे, हेच सोपे जाईल. हे दिसायला साधे दिसले तरी यात फार मोठे मर्म साठविले आहे हे ध्यानात धरा. ''भगवंताच्या इच्छेने घडणार ते घडू द्यावे'' अशी निष्ठा उत्पन्न व्हायला त्याचे अनुसंधान सतत ठेवले पाहिजे. ''आहे त्यात समाधान, आणि भगवंताचे अनुसंधान,'' एवढीच सद्गुरूची आज्ञा असते. दुसऱ्याने आपल्याला दुःख दिले असता आपले अनुसंधान चुकते ही त्याची नव्हे, आपली चूक आहे.



'विषय कसा सुटेल ? मन एकाग्र कसे होईल ?' हे न कळले तरी चालेल. सोडण्याच्या गोष्टीचा अभ्यास करण्यापेक्षा धरण्याच्या गोष्टीचा, म्हणजे अनुसंधानाचा, अभ्यास करावा. एक भगवंताचे अनुसंधान ठेवले की सर्व गुण आपोआपच वाढतील; ते कसे, तर शरीराचे अवयव सारख्या प्रमाणात वाढतात तसे. झाडाच्या मुळाला पाणी घातले की, त्याच्या सर्व भागांना ते पोहोचते, तसे भगवंताचा विसर पडू न दिला तर सर्व काही बरोबर होते. ''अज्ञानाच्या अंधकाराने दुःख भोगत असताना तू माझे स्मरण, माझे अनुसंधान ठेव, म्हणजे तुला पुढे उजेड दिसेल,'' असे गीतेमध्ये प्रत्यक्ष श्रीकृष्णच अर्जुनाला सुचवीत आहेत. दिवा जळायला हवा असेल तर त्यामध्ये सतत तेल घातले पाहिजे, तसे भगवंताचे अनुसंधान सारखे राहण्यासाठी त्याचे नामस्मरण आपण सतत करीत असावे. ज्याचे अनुसंधान अखंड टिकले, त्याचे खाणे, पिणे, उठणे, बसणे वगैरे सर्व क्रिया भगवंताची सेवाच बनतात. **२५. भगवंताचे अनुसंधान हे आपले ध्येय. त्याला अनुसरून बाकीच्या गोष्टी आपण करू या.**

## जंगली महाराज

आधुनिक केसरी

अनेक उर्दू, फार्सी, मोडी दस्तावेजांचा त्यांनी धांडोळा घेतला. सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक डॉ. ग. ह. खरे यांच्यासारख्या चिकित्सक अभ्यासकांशी चर्चा केली. जंगली शहा यांचे जन्मगाव सोलापूर जवळील होनमुर्गी हे लहानसे खेडे. होनमुर्गी गावाचे कुलदैवत बसवेश्वर हे आहे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, १५ फेब्रुवारी २०२४
adhunikkesari.com

# लोणंद येथे आजपासून शरद कृषी महोत्सवास होणार सुरुवात

## शरद पवारांच्या हस्ते उद्घाटन : डॉ. नितीन सावंत यांचे आयोजन


आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** देशाचे माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या हस्ते



लोणंद ता.खंडाळा येथील शरद कृषी महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी करण्यात येणार आहे.यावेळी आमदार रोहित पवार यांची उपस्थिती असणार आहे.या कृषीप्रदर्शनाचे आयोजक असलेले डॉ.नितीन सावंत यांच्या विशेष प्रयत्नातून हे कृषी प्रदर्शन भरत आहे.दरवर्षी डॉ.नितीन



सावंत यांच्याकडून हे कृषी प्रदर्शन घेतले जात असते.यावर्षी सुद्धा १५ ते १९ फेब्रुवारी या दरम्यान या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले असून गुरुवार दि.१५ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता कृषी दिंडी काढण्यात येणार आहे.शुक्रवार दिनांक १६ फेब्रुवारी रोजी जेष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते उद्घाटन कार्यक्रम संपन्न होणार आहे.तसेच याच दरम्यान शाहीर राजेंद्र कांबळे-कडूसकर यांचा महाराष्ट्र माझा हा पोवाडा कार्यक्रम संपन्न करण्यात येणार आहे.शनिवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी होम मिनिस्टर हा कार्यक्रम दुपारी २ ते ६ या वेळेत घेण्यात येणार आहे.याचे सादरीकरण सिने अभिनेता नाना मळेगावकर हे करणार आहेत. रविवार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राची गौरवगाथा हा कार्यक्रम सायंकाळी ६ ते १० या वेळेत संपन्न होणार आहे.सोमवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी समारोप व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येणार आहे.तसेच बक्षीस वितरण समारंभ कार्यक्रम ही पार पडणार आहे.या प्रदर्शनातून तब्बल ४१ लाख रुपयांचे भारतातील सर्वांत उंच बैल आणि तब्बल ६ किलोचा कोंबडा पाहायला मिळणार आहे.दरवर्षी प्रदर्शनात वेग वेगळे आकर्षण आणण्याचा प्रयत्न हा डॉ.नितीन सावंत यांच्या कडून केला जात असतो.कृषी प्रदर्शनातून पीक स्पर्धा प्रत्येक दिवशी घेण्यात येणार आहे.शेती क्षेत्राशी निगडीत तसेच विविध स्वरूपाचे स्टॉल या कृषीप्रदर्शनात असणार आहेत.तसेच बी एस सी ॲग्री पदवीधरांसाठी स्पॉट इंटरव्ह्यू आणि ऑन स्पॉट जॉब ऑफर मिळवून देण्यात विशेष आयोजन करण्यात आलेले आहे.हे कृषीप्रदर्शन पाहण्यासाठी लोणंदच नव्हे तर आसपासच्या भागातील शेतकरी सुद्धा कृषी प्रदर्शनास भेट देऊन नवीन तंत्रज्ञान याबाबत माहिती घेत असतात.तसेच महिलावर्ग आणि चिमुकल्यांचा सहभाग सुद्धा मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत असतो. शालेय विद्यार्थ्यांच्या भेटी सुद्धा होत असतात.नव नवीन तंत्रज्ञान याबाबत जाणून घेण्यासाठी विविध भागांतील विशेष करून छोटे मोठे शेतकरी बांधव आवर्जुन येत असताना शेतीशी संबंधित विविध यंत्रे बुकिंग करतात.सर्वांनी या कृषीप्रदर्शनास भेट द्यावी.असे आवाहन शरद कृषी महोत्सवाचे आयोजक डॉ.नितीन सावंत यांनी केलेले आहे.

# भारत बंदच्या समर्थनार्थ करणार आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** संयुक्त किसान मोर्चा व कामगार कृती समिती यांनी केंद सरकारच्या जनहित विरोधी धोरणांविरोधात देशव्यापी ग्रामीण  शुक्रवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ भारत बंदची हाक दिली आहे. त्यानुसार भारत बंदच्या समर्थनार्थ गडचिरोली येथील इंदिरा गांधी चौकात शुक्रवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ दुपारी १२. ०० वाजता विविध राजकीय पक्ष, शेतकरी व कर्मचारी आणि कामगार संगटनांच्या वतीने केंद्र सरकारच्या जनहित विरोधी धोरणा विरोधात धरणे आंदोलन करण्यात येणार असून यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन प्रागतिक पक्ष महाराष्ट्र आघाडीने केले आहे.
शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनांना खर्चाच्या दिडपट हमीभाव देण्यात यावा. व हमीभाव कायदा करण्यात यावा. स्वामीनाथन आयोगाची अंमलबजावणी करण्यात यावी. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्यात यावी. शेती पंपासाठी मुबलक वीज पुरवठा करण्यात यावा.महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेले बोनस तातडीने वाटप करण्यात यावे. कर्मचाऱ्यांना जूनी पेंशन लागू करण्यात यावी. कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेतले जावे. असंघटित कामगारांना किमान २६ हजार रुपये मानधन देण्यात यावे. ६० वर्षांवरील असंघटित कामगार, शेतकरी, शेतमजूरांना पेंशन योजना लागू करावी. तलाव, धरणावर सौर ऊर्जा प्रकल्पांना मंजुरी देवून मच्छीमार समाजाचे व्यवसाय संपविणे तातडीने थांबविण्यात यावे. प्री - पेड विद्युत मीटर रद्द करण्यात यावे, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.
गडचिरोली जिल्ह्यात पेसा व वनहक्क कायद्यांची अंमलबजावणी करण्यात यावा. लोह खाणी खोदण्यासाठी स्थानिक आदिवासी शेतकऱ्यांवरील अन्याय करणे बंद करण्यात यावे. कोनसरी लोह प्रकल्पांसाठी बळजबरीने जमीन संपादन करणे थांबविण्यात येवून भूसंपादन कायदा २०१३ ची अंमलबजावणी करण्यात यावी. मेडीगट्टा धरणग्रस्तांना न्याय देण्यात यावा. वडसा - गडचिरोली रेल्वे लाईनच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या जमिनीतून माती - मुरुमाचे उत्खनन करून शेती उध्वस्त करणे बंद करण्यात यावे.वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात जखमी व मृत शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यात यावी. हत्ती, डुक्कर, निलगाय यासारखे वन्यप्राण्यांनी पीकांचे नुकसान केलेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यात यावी, अशा स्थानिक मागण्याही या भारत बंदच्या समर्थनार्थ होणाऱ्या धरणे आंदोलनात केल्या जाणार आहेत.
भाजप सरकारच्या विरोधातील प्रागतिक पक्ष महाराष्ट्र आघाडी व  काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना (उबाठा) यांच्या सह कर्मचारी महासंघ, आयटक, सीटू यांच्यासह विविध शेतकरी, कामगार संघटना आणि शेतकरी, कामगार, मच्छीमारांनी या धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. डॉ. महेश कोपूलवार, कॉ. देवराव चवळे, ॲड. जगदीश मेश्राम, अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे केंद्रीय उपाध्यक्ष रोहिदास राऊत, हंसराज उंदिरवाडे शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई रामदास जराते, जयश्री जराते, शामसुंदर उराडे, बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पक्षाचे जिल्हा प्रभारी राज बन्सोड, जिल्हाध्यक्ष मिलिंद बांबोळे, प्रतिक डांगे, सतिश दुर्गमवार, माकपचे कॉ. अमोल मारकवार, समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष इलियास पठाण, गोंडवाना गणतंत्र पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत मडावी, आदिवासी विकास युवा परिषदेचे जिल्हाध्यक्ष विनोद मडावी यांनी केले आहे.



# सकल मराठा समाजाच्या वतीने महाराष्ट्र बंदच्या हाकेला लोह्यात १०० टक्के प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** सकल मराठा समाजाच्या वतीने आज दि.(१४) फेब्रुवारी रोजी  महाराष्ट्र बंदच्या हाकेला प्रतिसाद देत लोहा शहरात १०० टक्के बंद यशस्वी झाला. सगे सोयरे या शब्दाची व्याख्या करून अधिसूचनेचे रूपांतर कायद्यात करण्यात यावे या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरंगे पाटील यांच्या पुन्हा अमरण उपोषणाचा आज पाचवा दिवस होता. मनोज पाटील जरंगे यांची तब्येत खालावली असून आंतरवाली सराटी कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सकल मराठा समाजाच्या बांधवांच्या महाराष्ट्र बंदच्या हाकेला प्रतिसाद देत उग्र आंदोलन न करता, संविधानीक मार्गाने शांततेत बंद पार पडला. लोहा शहर बंद करण्यासाठी व्यापाऱ्यांनी स्वयंस्फुर्तीने पाठिंबा देत आपली दुकाने, प्रतिष्ठाने, हॉटेल, शाळा, महाविद्यालये बंद ठेवून १०० टक्के कडकडीतपणे बंद ठेवण्यात आले. अत्यावश्यक सेवा मेडिकल, दवाखाने, शासकीय कार्यालये वगळता बंद पुर्णपणे यशस्वी झाला. कुठे अनूचित प्रकार घडणार नाही याची पुरेपूर काळजी सकल मराठा समाज बांधवांनी घेतली. पोलीस प्रशासनाकडून लोहा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या वतीने लोह्यात मोठ्या प्रमाणात तगडा बंदोबस्त लावण्यात आला होता.

# नीलेश पाझारे : चंद्रपूरचा असा ही एक अवलिया दिव्यांग

## पार्थशर समाचारकडून रत्न पुरस्काराने सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

प्रा. शाम हेडाऊ

चंद्रपूर : एखादे ध्येय उराशी बाळगूण त्यासाठी झपाटल्यागत कार्य करणारे, कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी त्यावर मात करून निस्वार्थीपणे वाटचाल करणारे आजच्या काळात फारच दुर्बलतेनेच आढळतात. त्यातही स्वतः दिव्यांग असून एखाद्या स्वस्थ व्यक्तीला सुद्धा लाजवेल अशा रितीने कृतीशील जीवन जगणारा एक अवलिया  प्रवृत्तीचा व्यक्ती म्हणजेच  चंद्रपूरचा निलेश स्मिता योगेश पाझारे ! १६ जानेवारी २००७ ला एका भीषण अपघातात एक पाय गमावला, त्यात दुसऱ्या पायालासुद्धा बरेच जखमा झाल्या होत्या. यातुन स्वतःला सावरण्यासाठी व स्वतःच्या पायावर चालायला किमान १-२ वर्ष लागेल अशी अवस्था होती. पण या अपघात मधून स्वतःला सावरत व स्वतःच्या पायावर उभे राहून चालायचे या जिद्दीमुळे तो अवघ्या ४ महिन्यांतच वॉकर घेवून चालु लागला. स्वतः दिव्यांग होण्याच्या अगोदर बाबा आमटे यांचे कार्य पाहून दिव्यांग समुदायासाठी कार्य करायची आवड होती. समाजासाठी आपले काहीतरी देणे आहे हे निलेशला त्याच्या आई-वडील कडून वारसा मिळाला आहे. निलेशच्या तोंडून नेहमी जन्मदात्या आई-वडीलांचे नांव निघत असते वेळप्रसंगी तो त्यांच्या कार्याचं उदाहरण देखिल देत असतो. हाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून दिव्यांग समुदायसाठी निलेशने काम करणे सुरु केले. दिव्यांगाला दिव्यांग प्रमाणपत्र तयार करून देणे, बस-रेल्वे सवलत करून देणे, दिव्यांगासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजनाची माहिती देणे, स्थानिक स्वराज्य संस्थेत  कोणत्या योजना राबिल्या जातात याची माहिती देणे. शासनाने किंवा सामाजिक संस्थानाने दिव्यांग साठी काही शिबीर, मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन केले असेल तर ती माहिती जिल्ह्यातील दिव्यांगबांधवा पर्यंत नचुकता पोहोचविणे.



दिव्यांगांचे जीवनमान उंचावण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून नाविन्य पूर्ण योजना तयार करून राबविता येणार का या साठी सत्याताने पाठपुरावा करत राहून त्या योजना राबविणे. याचा सकारात्मक परिणाम हा आहे कि संपूर्ण महाराष्ट्रात दिव्यांग समुदाय साठी चंद्रपूर जिल्ह्यामध्ये अनेक स्वयंरोजगाराच्या योजना राबविल्या जातात. अपघातात आलेल्या दिव्यांगत्वाचे दुःख कुरवडत बसण्यापेक्षा त्यावर प्रखर व दुर्दम्य अशा इच्छा शक्तीच्या बळावर हावी होऊन समाजातील हतबल व आनंदी जगण्याचा बळ गमावून बसलेल्या दिव्यांग बांधवांसाठी निलेशचे कार्य एखाद्या दिपस्तंभसारखे प्रेरणादायी आहे. याचीच दाखल घेत पार्थशर समाचार चंद्रपूर यांच्या तर्फे २०२४ चे चंद्रपूर रत्न हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. आपल्या निस्वार्थ सेवेच्या माध्यमातून समाजाच्या विशेषता दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी झटणाऱ्या या हुरहुन्नरी अवलिया व्यक्तिमत्वाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व शुभकामना! चंद्रपूर पार्थशर समाचारच्या वतीने निलेश पाझारे यास चंद्रपूर रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल कल्पना शिंदे, पुष्पा सावसाकडे, दर्शना चाफले, स्नेहल कन्नमवार, गीता भडके, रश्मी करिये, भाग्यश्री कोलते, मुन्ना खोब्रागडे, सतीश मुल्लेवार, पंकज मिश्रा, रवींद्र उपरे, सुभाष मोहुर्ले, शिवसागर चंदनखेडे, शिवशंकर कोलते, भास्कर कांबळे, हिरा सोनदरकर, जयकुमार पवार, प्रमोद डोंगरे, प्रफुल सोमनकर, मनोज पिपरे, नंदा सातपुते, सतीश कोलते, उत्तम साव, अर्पिल चौधरी, मनोज अस्वले, निसार खान, राहुल खटी, आदिंनी त्याचे अभिनंदन केले आहे.


## शरीफ यांची माघार

आधुनिक केसरी

अटीतटीच्या ठरलेल्या पाकिस्तानातील सार्वत्रिक निवडणुकीत कोणालाच बहुमत मिळालेले नाही. परंतु, पाकिस्तान मुस्लिम लीग (PML-N) या पक्षाने इतर अपक्षांसह सत्ता स्थापनेचा दावा केला आहे. परंतु या घडामोडीत एक आश्चर्यकारक घटना घडली आहे. निवडणूक प्रचारात स्वतःला पंतप्रधान म्हणून घोषित केलेल्या नवाझ शरीफ यांनी पंतप्रधान पदाच्या शर्यतीतून माघार घेतली असून त्यांच्या पक्षाकडून माजी पंतप्रधान शेहबाज शरीफ यांचं नाव पुढे करण्यात आलं आहे. शेहबाज शरीफ हे नवाझ शरीफ यांचे धाकटे बंधू आहेत. पीएमएल(एन) पक्षाच्या प्रवक्त्या मरियम औरंगजेब यांनी एक्सद्वारे ही माहिती दिली. नवाझ शरीफ यांनी पीएमएल-एन (आगामी सरकार स्थापन करण्यासाठी) ला पाठिंबा देणाऱ्या राजकीय पक्षांचे आभार मानले आहेत आणि अशा निर्णयांमुळे पाकिस्तान संकटातून बाहेर येईल, अशी आशा व्यक्त केली आहे, असे मरियम औरंगजेब म्हणाल्या. ८ फेब्रुवारीला पाकिस्तानात सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडली. त्यानंतर बऱ्याच गोंधळानंतर मतमोजणी प्रक्रिया सुरू झाली. मतमोजणीत कोणालाच स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. नवाझ शरीफ यांचा पीएमएल(एन), बिलावल भुट्टो यांचा पीपीपी आणि तुरुंगात असलेले माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या समर्थक (पीटीआय) या तीन पक्षांत सार्वत्रिक निवडणुकीची खरी लढत झाली. परंतु, या तिघांपैकी कोणालाची स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यामुळे सत्तास्थापनेचा दावा कोण करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. दरम्यान, पीएमएमल (एन) पक्षाची पीपीपीच्या बिलावल भुट्टो यांच्या पक्षाबरोबर युतीची चर्चा सुरू होती. या दोन्ही पक्षांत अनेक बैठका झाल्याचेही सांगण्यात येते. तसेच, बिलावल भुट्टोही पंतप्रधान पदाच्या शर्यतीत होते. त्यामुळे बिलावल भुट्टोंच्या सहकार्याने सरकार स्थापन झाले तर पंतप्रधान कोण असणार हा मोठा प्रश्न होता.परंतु, बिलावल भुट्टो यांनी आयत्या वेळी पंतप्रधान पदाच्या शर्यतीतून माघार घेतली. बिलावल भुट्टोंच्या नेतृत्वाखाली झालेल्या पीपीपीच्या उच्चाधिकारी केंद्रीय कार्यकारी समितीच्या (सीईसी) बैठकीनंतर पत्रकार परिषदेला संबोधित करताना बिलावल म्हणाले की, आमच्या पक्षाला संघीय सरकार स्थापन करण्याचा अधिकार नाही हे वास्तव आहे. यामुळे, मी पाकिस्तानच्या पंतप्रधानपदाच्या उमेदवारीसाठी स्वत: ला पुढे करणार नाही. तसेच, सत्तास्थापनेसाठी पीएमएल (एन) पक्षाला पाठिंबा देत असल्याचेही त्यांनी जाहीर केले. एवढेच नव्हे तर पीएमएल (एन) पक्षाला पाकिस्तानी लष्कराचाही पाठिंबा आहे.

## आ. झनक...तुमचे चुकलेच !

आधुनिक केसरी



सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

**कालपरवा ला राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी काँग्रेसच्या प्राथमिक सदस्यत्वाचा आणि विधानसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला आणि भाजपाची वाट धरली. त्या अनुषंगाने चव्हाण परिवार आणि झनक परिवारातील मागील 3 पिढ्यांपासूनचे ऋणानुबंध पाहू जाता रिसोड विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमित सुभाषराव झनक हे देखील अमर राजूरकर यांच्या सारखेच अशोक चव्हाण यांच्या निर्णयाला साथ देऊन हाताची साथ सोडतील असे राज्याला वाटले मात्र काँग्रेसने झनक कुटुंबियांना खूप काही दिले आहे.काँग्रेस सोडण्याचा विचार आपल्या डोक्यात येऊच शकत नाही अशी प्रतिक्रिया व्हिडीओ च्या माध्यमातून सोशल मीडियावर पोस्ट करून झनक यांनी ह्या चर्चेला पूर्ण विराम दिला.**



अशोकराव चव्हाण यांचे वडील कै शंकरराव चव्हाण हे राज्याचे 2 वेळा मुख्यमंत्री, देशाचे संरक्षणमंत्री आणि देशाचे गृहमंत्री पद त्यांनी भूषविलेले आहे.राज्यात अनेकदा त्यांनी मंत्रीपद देखील उपभोगले. १९७८ ला शरद पवार यांनी जो पुलोद चा प्रयोग केला होता,त्यात शरद पवार यांच्या नेतृत्वातील मंत्रिमंडळात देखील ते मंत्री होते. त्यावेळी शंकरराव चव्हाण यांनी इंदिराजींची साथ सोडून शरद पवार यांना साथ दिली होती.

त्यांचेच चिरंजीव असलेले अशोकराव चव्हाण यांना देखील काँग्रेसने भरभरून दिले.युवक काँग्रेस चे प्रदेशाध्यक्षपद, राज्यात राज्यमंत्री, मंत्री,2 वेळा मुख्यमंत्री,काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पद, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी चे सदस्य,उमेदवारी वाटप प्रक्रियेत महत्वाचे स्थान हे सारं काही दिलेलं असतांना देखील या कानाची त्या कानाला खबर लागू न देता अशोकराव चव्हाण यांनी काँग्रेसचा हात सोडून देत आपल्या हातात भाजपाचे कमळ धरले आहे.

दुसरीकडे आपण झनक पारिवाराच्या राजकीय वाटचालीकडे जर दृष्टीक्षेप टाकला तर लक्ष्यात येईल की स्व गोपाळराव झनक हे काँग्रेसचे नेते होते त्यांना काँग्रेसने काहीच दिले नसतांना देखील ते काँग्रेसच्या विचारासोबतच राहले

स्व ऍड.रामराव झनक हे तब्बल 4 वेळा काँग्रेसचे आमदार होते एम एस सी गोल्ड मेडालिस्ट व एल एल एम असे उच्च शिक्षित होते.फूट बॉल चे ते राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू होते. वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात वसंतराव नाईक यांचेसह एकही सदस्य स्व रामराव झनक यांच्या एव्हडा उच्चशिक्षित नव्हता. तब्बल 4 वेळा आमदार राहूनही त्यांना कॅबिनेट तर सोडा परंतु साधे राज्यमंत्रीपद देखील दिल्या गेले नाही. त्यानंतर आ सुभाषराव झनक हे 3 वेळ आमदार राहल्यानंतर त्यांना 2 टर्म अर्थात 10 वर्ष पक्षाने प्रवाहाच्या बाहेर ठेवले.शाबूत ठेवलेला जनसंपर्क व त्यांनी पक्षासोबतच आपले इमान ठेवल्याने 2009 मध्ये त्यांना नव्याने मेडशी या नावावरून रिसोड मतदार संघ झालेल्या मतदारसंघात उमेदवारी मिळाली. काँग्रेसचे तत्कालीन नेते अनंतराव देशमुख यांनी बंडखोरी केली,तरीही काँग्रेसचा तिरंगा त्यांनी रिसोड मतदारसंघात फडकवला. तत्कालीन मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात



महिला व बालविकास खात्याचे मंत्री केले.अवघे एका वर्षाचे मंत्रिपद उपभोगत असतांना अशोक चव्हाण यांचा आदर्श घोटाळा समोर आला,त्यात त्यांचे मुख्यमंत्री पद गेले आणि पृथ्वीराज चव्हाण यांच्या मंत्रिमंडळात अशोक चव्हाण यांच्या मंत्रिमंडळातील केवळ सुभाष झनक यांनाच वगळून वर्षा गायकवाड यांना घेण्यात आले. तरी देखील स्व सुभाषराव झनक यांनी काँग्रेस बद्दल नाराजी व्यक्त केली नाही.

आ सुभाषराव झनक यांच्या अकाली मृत्यूमुळे रिक्त झालेल्या जागेवर अवघ्या 6 महिन्यासाठी लागलेल्या पोटनिवडणुकी दरम्यान मोदींची प्रचंड लाट देशभर पसरलेली होती. त्यातल्या त्यात लोकसभा आणि पोटनिवडणुक एकत्र होती,असे असतांना अमित झनक यांच्या रूपाने काँग्रेसने वादळात दिवा पेटवला. वाशीम अकोला जिल्ह्यात केवळ झनक यांच्या रूपाने आजपर्यंत केवळ एकच काँग्रेसचा आमदार असतांना व अमित झनक यांची तिसरी टर्म असतांना उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील सरकार मध्ये आ अमित झनक यांना निदान राज्यमंत्री पद दिल्या जाईल अशी आशा होती.त्यावेळी देखील आ अमित झनक यांच्या तोंडाला पाने पुसल्या गेली. युवक काँग्रेसच्या पक्षांतर्गत संघटनात्मक निवडणुकीत आ अमित झनक यांनी अध्यक्षपदासाठी निवडणुकीत उडी मारली असतांना बाळासाहेब थोरात यांचे भाचे सत्यजित तांबे यांच्यासाठी अमित झनक यांना थांबविल्या गेले. आज तेच सत्यजित तांबे काँग्रेस पासून दूर झालेले आहेत. पात्रता असतांना देखील काँग्रेसने अनेकदा डावलले असतांना देखील झनक परिवाराने निष्ठा कधी ढळू दिली नाही.अवहेलना सहन केली पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत देखील त्यांच्या विरुद्ध बंडखोरी झाली तरीही त्यांनी काँग्रेसचा गड कायम ठेवला. आज सत्तेसोबत जाण्याची संधी आपसूकच आलेली असतांना देखील काँग्रेसने आमच्या झनक कुटुंबियांना खूप काही दिले याची जाणीव ठेवत नाराजीचे सूर न गाता संकटाच्या काळात काँग्रेसचा हात वाऱ्यावर न सोडता घट्ट पकडून ठेवला आहे. निष्ठेचे दुसरे नाव झनक कुटुंबीय असल्याचा दाखलाच यानिमित्ताने आ अमित झनक यांनी दिला आहे,परंतु अलीकडचे स्वार्थी राजकारण पाहू जाता हेच म्हणावे लागेल...आ अमित झनक, तुमचे चुकलेच !

## व्हॅलेंटाईन्स डे, लिव्ह - इन रिलेशनशिप ; प्रेम की हिंसा ?

आधुनिक केसरी



डॉ. प्रकाश खेत्री,
मुंबई, ७८४३०९२२४४

**प्रिय मित्र-मैत्रिणींनो, देशभरात दोन विषयावर आपण नेहमी चर्चा करतो, एक 'प्रेम', दुसरे म्हणजे प्रेमासाठी होणारी 'हिंसा' व 'क्रौर्य'. जगात दरवर्षी 14 फेब्रुवारी हा दिवस "व्हॅलेंटाईन्स डे" म्हणजे "प्रेम दिवस" म्हणून साजरा करण्यात येतो. या दिवसाला खास इतिहास आणि संदर्भ आहे. रोमनमध्ये साधारणत: तिसऱ्या शतकात सम्राट कॅलेडस हा राजा होऊन गेला. प्रेम आणि लग्नामुळे सैनिकांचे लक्ष विचलित होते, अशी त्याची समजूत होती. तेव्हा 'सैनिकांनी प्रेम आणि लग्नच करू नये', असा फतवा त्याने काढला होता. या हुकुमशाही व फतव्या विरोधात धर्मगुरू सेंट व्हॅलेंटाईन यांनी बंड केले, 'सैनिकांनो बिनधास्त प्रेम करा' हा संदेश दिला. प्रेमिक सैनिकांची त्यांनी प्रेमविवाह लावून दिले, लोकांचा पाठिंबा मिळत गेला.**

**(मागील अंकावरून)** लग्नाशिवाय दीर्घ काळासाठी एकमेकांसोबत राहणे, एकमेकांना जाणून घेण्याचा मार्ग मानला जात आहे. यासाठी मैत्रीपूर्ण भावनेतून एकमेकांच्या सानिध्यात वेळ घालवला जातो, पुढे कायमचे लग्न करून किंवा लिव्ह-इन रिलेशनशिप मानत अखंड सोबत राहावे. ही लिव्ह-इन या मागची भावना आहे. परंतु आपल्या देशात खरोखर असे घडताना दिसत आहे काय ? परस्पर सामंजस्य, अवलंबित्व, एकमेकांशी जोडीदाराप्रमाणे प्रामाणिक वागणे, नात्याच्या जबाबदारी महत्वाची की टाईमपास, मजामस्ती म्हणजे लिव्ह-इन रिलेशनशिप ? फ्रेन्डशिप, लिव्ह - इन रिलेशनशिप - प्रेम की हिंसा ? असे अनेक प्रश्न पडत आहेत. कारण २०२३ मध्ये नागपूर जिल्हात पारशिवनी तालुक्यात पेंढारी गावातील प्रेमी युगलांनी एकाच दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. सोलापूर जिल्हा उत्तर



सोलापूर तालुक्यातील कवठे गावात एका प्रेमी युगुलाने एकाच झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला. पुणे वाघोली येथील एका लॉज मध्ये प्रेमी युगलाने गळफास घेवून आत्महत्या केली. अशा प्रेमासाठी अनेक घटना आपल्या भोवती घडत आहेत. या घटना नित्याच्या झाल्या आहेत. हे अत्यंत दुःख दायक आणि चिंतेचा बाब आहे.

तर दुसरीकडे देशात श्रद्धा वालकर, निक्की यादव हे लिव्ह इन हत्या प्रकरणं चर्चेत असतानाच, मुंबईत राहणाऱ्या आफताब पूनावाला याने आपल्याच मैत्रिणी श्रद्धाची दिल्लीत नेऊन हत्या करून तिचे ३५ तुकडे केली. इतकेच नाही तर त्याने श्रद्धाचे तुकडे तब्बल १८ दिवस फ्रीजमध्ये ठेवले. हे दोघेही दिल्लीत लिव्ह इन रिलेशनमध्ये एकत्र राहत होते. श्रद्धाने अफताबला लग्नाचा तगादा लावल्याने त्याने श्रद्धाची हत्या केली. मध्य प्रदेश मधील उज्जैनच्या चिमणगंज पोलीस ठाण्यासमोरील झोपडीत राहणाऱ्या महिलेचे काठीने मारहाण हत्या केली, भिवंडी तालुक्यातील कोनगाव ३५ वर्षीय महिलेचा प्रियकराने गळा चिरून हत्या करणे. आदी घटनांनी सबंध देश हादरून गेला. आणि पुन्हा एकदा लिव्ह इन रिलेशनशिपवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. हे सर्व अत्यंत भयावह आहे, तसेच आजच्या 'व्हॅलेंटाईन्स डे' निमित्ताने 'प्रेम' आणि 'हिंसा' या बाबत आत्मचिंतन करायला लावणारे आहे.

तेव्हा तरुण मित्र-मैत्रिणींनो, प्रत्येक क्षण जगण्यायोग्य आणि नोंदण्यायोग्य करावयाचे असेल तर जीवनातील प्रत्येक घटनेकडे वस्तुनिष्ठ आणि डोळसपणे आपण पहिले पाहिजे, जागरूकपणे आपले डोळे आणि कान उघडे ठेवले पाहिजेत. जीवनात आपण स्वतःहून निर्णय घेतले नाहीत, तर सभोवतालची सामाजिक परिस्थिती वा जनरेटा आपल्याला निर्णय घ्यायला व कृती करावयाला भाग पाडतो. व आपल्याला नको असलेले परिणाम वा भोग भोगावे लागतात, त्या परिस्थितीचे बळी पडावे लागते. यांची जाणीव आपल्या नेणिवेत सातत्यानी ठेवली पाहिजे. तेव्हा कुठे आपण आपल्या जीवनाचे शिल्पकार आणि विधाते होऊ. तेव्हा आजच्या 'व्हॅलेंटाईन्स डे' 'प्रेमाच्या दिवशी' सभोवतालच्या परिस्थितीचा विचार करून आपण 'स्व' निर्णय घेत, इतरांचे स्वातंत्र्य व अस्तित्व मानत, निर्भयपणे जगले पाहिजे...!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आदर्श गुरु : प्रा. डॉ. कन्नुलाल विटे सर !

आधुनिक केसरी

*शिक्षक हा समजाचा अविभाज्य घटक. हाताच्या करंगळीला धरून ज्ञानाच्या अथांग सागरापर्यंत नेणारे शिक्षक. आपल्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन, परिस्थितीच्या छाताडावर पाय देत यश कसं गाठायचं हे शिकवणारे शिक्षक. आपल्याला लहानपणापासून शाळेची गोडी लावणारे शिक्षक. काळ्या फळ्यावर पांढऱ्या खडूने आयुष्य आणि भविष्य लिहिणारे शिक्षक. आपल्याला लहानपणापासून अक्षराची ओळख करून देणारे 'अ' च्या अज्ञानापासून तर 'ज्ञ' च्या ज्ञाना पर्यंत चा प्रवास म्हणजे शिक्षक. प्रत्येकाच्या आयुष्यात गुरूला अनन्यसाधारण महत्व आहे. योग्य वेळी योग्य ती शिकवणी देऊन गुरू आपल्याला सहनशील बनवत असतात. एक महान तत्त्ववेत्ता असं म्हणतो, 'गुरू दुनिया का सबसे बडा लम्हां हैं,जिसे मिला वो तन्हाई मे भी खुश और जिसे ना मिला भीड मे भी अकेला'. प्राध्यापक असं नाव जरी ऐकलं तर सुटाबुतातले आवाजात दाब टाकून बोलणारे, नजरेत नजर घालून बोलणारे महाशय आपल्याला आठवतात. असं म्हणतात की एखादा डॉक्टर बिघडला तर रुग्ण दगावेल, एखादा अभियंता बिघडला तर एखादी इमारत कोसळेल ; पण एखादा शिक्षक बिघडला तर पूर्णच्या- पूर्ण पिढीच गारद होऊन जाईल. शिक्षक हा समाजाचा कणा समजला जातो.*

शिक्षक दिनानिमित्त अनेक जण आपल्या शिक्षकांचं गोड भाषेत वर्णन करतात. वेगवेगळ्या उपमा देतात. एवढेच काय तर संत कबीर यांनी देखील गुरूचे महत्त्व स्पष्ट केलेलं आहे. "गुरु- गोविंद दो खडे काकी लागू पाव" गुरु आणि देव सोबत उभा आहेत आणि मी कोणाचे पाय धरू? अर्थात मी गुरुचे पाय धरीन कारण गुरूमुळे मला देवाचे दर्शन लाभले. प्रत्येकाच्या आयुष्यात असे काही गुरुजन येतात ज्यांना आपण आपलं सुख, दुःख, समस्या आणि मनमोकळ्या गप्पा मारू शकतो.त्यांच्यावर प्रेम करतो. त्यांना जीव लावतो. त्यांना आपलंसं करून घेतो. असा एक तरी शिक्षक आपल्या आयुष्यात असतोच असतो. आज मी आपल्याला अशा अनोख्या प्राध्यापका विषयी सांगणार आहे, जे नेहमीच हसतमुख असतात. मॉडेल कॉलेजच्या सर्व शिक्षकांचे देखील त्यांना सहकार्य असतं. ग्रामीण भागातला विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात येऊन त्या विद्यार्थ्यांनी अधिकाधिक प्रगती करावी असं नेहमी सरांना वाटतं. आपल्या कामाशी प्रामाणिक असतात. सरांना रोज अनेक नवनवीन विद्यार्थी भेटतात. प्रत्येक विद्यार्थ्यांशी माय माखल्या नजरेने बघणारे व तुपात भिजलेल्या शब्दांनी बोलणारे आमच्या मॉडेल डिग्री महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख, तथा उपप्राचार्य प्रा. डॉ. कन्नुलाल विटोरे सर होय...! महाविद्यालयाच्या तासिका संपल्यावर सगळे मित्र आपापल्या मित्रांना शोधण्यात व्यस्त असायचे. आणि आम्ही सरांना शोधायचो. कारण प्रत्येक मित्र हिंदी विभागात भेटायचा. एकाच छताखाली सगळे असायचे तो म्हणजे मॉडेल कॉलेजचा हिंदी विभाग होय... मॉडेल कॉलेजचे उपप्राचार्य हे पद सांभाळत सर लोकमत समाचार चे देखील तालुका प्रतिनिधी आहेत. कॉलेजचा सांस्कृतिक विभाग देखील सर सांभाळतात. युवक महोत्सव, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम, शिक्षक दिन वा अजून कोणताही कार्यक्रम असो सरांचं नाव अग्रगण्यच. ग्रामीण भागातील एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित नाही राहिला पाहिजे हा सरांचा मुख्य हेतू. आज कॉलेज खूप आहेत.प्राध्यापक खूप आहेत. सरांचं पूर्ण दिवस कामात जातो. तरीदेखील सर आपला छंद जोपासता. प्रत्येक विद्यार्थ्याला आपलंसं करून बोलतात. सरांचं कार्य असिमित आहे,अमर्याद आहे, निस्सीम आहे. विशाल आहे. सरांची ग्रामीण भागाशी नाळ घट्ट जोडलेली आहे. आपल्या कवितांच्या माध्यमातून सर नेहमी खेड्याचं वर्णन करत असतात. एक प्राध्यापक, एक कवी,एक महान लेखक,आणि एक समजून उमजून घेणारे शिक्षक आम्हास लाभले.' परी काय लिहावे'. हा मोठा प्रश्न आहे. शब्द अपुरे पडतील असं कार्य आहे सरांचं. आज सरांचा वाढदिवस आहे त्या निमित्त हा छोटासा लेखन प्रपंच. आज समाजात दिसतय कोणा एका भ्रष्ट पुढाऱ्याचा,एका बलात्कारी माणसाचा, एक गुंडाचा आदर्श घेऊन आपला समाज कितपत प्रगती करतोय? याचा विचार करणं गरजेचं आहे. गुरुजी कसे सावे याच उत्तम उदाहरण म्हणजे मॉडेल कॉलेज चे हिंदी विभागाचे प्रमुख आ.प्रा. डॉ. कंन्नूलाल विटोरे सर होय...मधाळ आणि रसाळ व्यक्तिमत्व. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. इथं रत्न जन्म घेतात. सर



हिंदी विभाग सांभाळत सांस्कृतिक कार्यक्रमात अग्रेसर असतात. आपल्या कवितांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचे वर्णन हे विशेष. या व्यतिरिक्त ही सरांचे काही पुस्तक प्रकाशित झालेली आहेत.या मध्ये सूर्यबाला की कहानियों का मनोवैज्ञानिक अध्ययन : थाली भर चांद के विशेष संदर्भ मे, तलाशता सच (काव्य- संग्रह), सूर्यबाला के कथा - साहित्य मे सामाजिक, आर्थिक, एवं मनोवैज्ञानिक अध्ययन, तलाशता सच ( काव्य- संग्रह) द्वितीय संस्करण (2022), मराठी लोक साहित्य कोश - (2023) केंद्रीय हिंदी संस्थान आग्रा सह -संपादन, हार से नहीं हारा हूं ( अन्य- संग्रह), मेरी अनुभूती मेरे अपने ( संस्मरणात्मक निबंध) कोवळे उन्ह मी अजूनही तिथेच आहे ( अनुवादित हिंदी से मराठी ) या व्यतिरिक्त राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग. लोकमत समाचार तालुका प्रतिनिधी म्हणून देखील काम पाहतात.विविध काव्यसम्मेलनात सहभाग. महाकवी कालिदास प्रतिष्ठान मराठवाडा अध्यक्ष पद देखील सर संभाळत असतात. आठव्या महानुभाव साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद सरांनी भूषवलेलं आहे. सरांना नुकताच सुंदरेश्वर साहित्यरत्न पुरस्कार (2023) प्राप्त झाला आहे. गेल्या १२ वर्षा पासून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून सर महाविद्यालयात अध्यापनाच कार्य करत आहेत.(2020) च्या आठवे महानुभाव कवी संमेलनाचे अध्यक्ष राहिलेले आहेत. सांस्कृतिक कार्यक्रम,राज्यस्तरीय परीक्षक ,विविध शाळा, महाविद्यालयात वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यान सर करत असतात. शेतकरी आत्महत्या, वाढती महागाई, वाढत प्रदूषण, दिवसेंदिवस होत चाललेला भ्रष्टाचार, वाढती बेरोजगारी, कमी होत चाललेली मुलींची संख्या, तरुणांमध्ये व्यसनाधीनता अशा विविध विषयावरती व्याख्याने. विद्यार्थी मोठा झाला, चांगलं नाव कमावलं तर गुरूंना मूठभर मास चढल्यासारखं होत. म्हणून श्री संत ज्ञानोबा रायांनी आपल्या ज्ञानेश्वरी मध्ये गुरूचं महत्व स्पष्ट केलं आहे. 'गुरू क्षेत्र गुरू देवता,गुरू माय गुरू पिता जो गुरू सेवे परिता मार्गु नेने'...वाकू शकते.तस योग्य वयात गुरुजी आपल्याला ज्ञानामृत पाजत असतात.मोठा माणूस तो नसतो जो स्वतःला समजतो,तर मोठा माणूस तो असतो जो इतरांना लहान असल्याचा भास होऊ देत नाही.असे सर्वांचे लाडके आ.प्रा.डॉ.कंन्नूलाल विटोरे सर.... त्यांच्या वाढदिवसानिमित्त केलेला हा लेखन प्रपंच....



योगेश गुंजकर, जालना
संपर्क क्र. : 7218786440



## पत्रकारांच्या निवासस्थानासाठी जागा देण्याची मागणी; तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** जिंतूर तालुक्यातील पत्रकारांना व्यवस्थेसाठी शासकीय गायरान जमीन देण्यात यावी अशी मागणी एका निवेदनाद्वारे तहसीलदार जिंतूर यांच्याकडे करण्यात आली आहे. व्हाईस ऑफ मीडिया या देशपातळीवरील संघटनेने पत्रकारांच्या निवासस्थानाचा प्रश्न लावून धरला आहे. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे.

शावेळी पत्रकारांच्या अनेक समस्या प्रलंबित असून पत्रकारांचा निवासस्थानाचा प्रश्नही मागील अनेक दिवसापासून प्रलंबित अवस्थेत आहे जिंतूर तहसील कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील पुंगळा या भागातील दोन एकर गायरान जमीन पत्रकारांच्या निवासस्थानासाठी आपल्या स्तरावर देण्यात यावी जेणेकरून तालुक्यातील पत्रकारांना अद्यावत असे घरे बांधण्यासाठी त्याचा उपयोग होईल जागे अभावी अनेक दिवसापासून हा प्रश्न रेंगाळत पडलेला आहे.

निवेदनावर मराठवाडा अध्यक्ष विजय चोरडिया तालुका अध्यक्ष भागवत चव्हाण ,तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष मंचक देशमुख, गुलाबराव शिंदे, सचिन रायपत्रीवार, दिलीप माघाडे ,आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. पत्रकारांच्या निवासस्थानासाठी राज्यभरामध्ये व्हॉइस ऑफ मीडियाच्या वतीने पुढाकार घेण्यात येत असून माढा राज्य शासन व केंद्र शासनाच्या मदतीतूनही घरी उभारण्यात येणार आहे केवळ जागेच पत्रकारांना अद्याप घरी मिळाली नाहीत शासन स्तरावर जागा उपलब्ध झाल्यास घरी बांधण्यासाठी पुरेसा निधी संघटनेच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहे.

## अली अलाना उर्दू हायस्कूल कुंजखेडा येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील कुंजखेडा येथील अली अलाना उर्दू हायस्कूलमध्ये आज रोजी कन्नड न्यायालय अंतर्गत कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष कन्नड न्यायालयातील न्यायाधीश श्रीमती मा.श्रीमती ए .आय .आवटी मॅडम होत्या.

या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांविषयीची कायदे तसेच पोक्सो कायदा काय असतो? यावर प्रकाश टाकला तसेच दिव्यांग विद्यार्थी कायदा मुली मुले व महिला वरील होणारे अत्याचार याविषयीची कायदे व उपाय -योजना स्पष्ट केले. याप्रसंगी संस्थेचे सचिव माननीय मौलाना फारूक रंधेरा साहेबांनी ही मोलाचे मार्गदर्शन केले.

शेवटी शाळेचे मुख्याध्यापक श्री शरीफबेग सरांनी शाळेविषयी तसेच शालेय कामकाजा संबंधी मोलाची माहिती दिली तसेच संस्थेची ध्येय धोरणे स्पष्ट केली.

सदर कार्यक्रमात कन्नड कोर्टातील वकील तसेच वकील संघाचे अध्यक्ष श्री जाधव साहेब तसेच उपाध्यक्ष एडवोकेट निसार शेख, एडवोकेट शेजवळ साहेब, सचिव एडवोकेट मिसाळ साहेब, चव्हाण मॅडम, संस्था प्रतिनिधी जहीर पटेल सर व शाळेतील विद्यार्थी व शिक्षक वृंद व इतर कर्मचारी उपस्थित होते.



# जिंतुरात मराठा आरक्षणाचा मसुद्यासाठी कडकडीत बंद




आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** मराठा समाजाने मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली अंतरवाली ते मुंबई पायीमोर्चा काढला होता त्यावेळी राज्य सरकारने मराठा समाजाला सरसगट आरक्षण देण्यासाठी सगेसोयरे बाबतची अधिसूचना काढण्यात आली होती म्हणून राज्य सरकारने तातडीने विधिमंडळ अधिवेशन घेऊन अधिसूचनेवर कायदा करावा या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने जिंतूर बंदचे आयोजन करण्यात आले होते यावेळी व्यापाऱ्यांनी बंदला पाठिंबा देत कडकडीत बंद पाळण्यात आला

जालना जिल्ह्यातील अंतरवाली ते मुंबई येथे मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली पदयात्रा काढण्यात आली होती. यावेळी राज्य सरकारने मराठा समाजाला ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत त्यांच्या नातेवाईकांना आरक्षण देण्यासाठी सगेसोयरे बाबतची अधिसूचना काढण्यात आली होती. त्याची तत्काळ अमलबजावणी करावी यासाठी विशेष अधिवेशन घेण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सुरू केले आहे दरम्यान चौथ्या दिवशी तब्यत खालावत जात आहे म्हणून सकल मराठा समाजाचा भावना राज्य सरकारच्या विरोधात तीव्र होत चालल्या आहेत यामुळे सकल मराठा समाजाने महाराष्ट्र बंदची हाक दिली होती दरम्यान जिंतूर शहरातील सकल मराठा समाजाने तहसीलदार व पोलीस निरीक्षकांना निवेदन देऊन बंद पाळण्याचे आवाहन केले होते यावेळी सकल मराठा समाजातील तरुणांनी प्रमुख रस्त्यावर मोर्चा काढून प्रशासनाला निवेदन दिले दरम्यान व्यापाऱ्यांनी बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद दिला यावेळी कडकडीत बंद पाळण्यात आला दरम्यान कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेबांनी आपण स्वतः मराठा समाज बांधवांसमोर काढलेली अधिसूचना कायद्यात बदलणार व दसरा मेळाव्यात छत्रपती शिवाजी महाराजांची शपथ घेऊन पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले होते म्हणून मुख्यमंत्र्यांनी आपले आश्वासन पूर्ण करून संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेले उपोषण तातडीने सोडवण्याची मागणी करण्यात आली आहे.

# माजी विद्यार्थ्यांची शाळेस भरभरून भेट

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** आपण सर्वच समाजामध्ये वावरत असताना अनेक धनदौलतीने संपन्न असणारे व्यक्ती पाहिले असतील परंतु असी माणुसे आपण कधीचं पाहिले नसतील हे तीतकेच सत्य आहे. पैसा हा सर्वांकडेच असतो कोणाकडे कमी प्रमाणात असेल, तर कोणाकडे खूप जास्त असेल हे आपण वास्तविक पाहत आहोत आणि हा पैसा चांगल्या कामासाठी व इतर समाजासाठी खर्च करण्याची हिमंत खूप कमी प्रमाणात क्वचीत माणसात दिसून येते. ते म्हणजे इटोलीचे भुमीपुत्र यांना उचीत ठरेल. अशीच एक व्यक्ती म्हणजे रंगनाथ अप्पा तीळकरी खरं पाहिलं तर या प्रांजळ व्यक्तीशी फारसा संबंध नाही, फक्त संबंध एव्हढाच की आपण या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक इटोली शाळेत शिकलो आणि घडलो तसेच आपल्या गावातील मुलं शिकतात आणि भविष्यकाळात उद्याचे यशस्वी भावी नागरीक होणार या निर्मळ अंतकरणाने या शाळेसाठी आपणसुद्धा काही तरी आर्थिक ओझ उचलावं हा उदात्त हेतू डोळ्यांसमोर ठेऊन शाळेसाठी जानेवारी सन 2019 मध्ये भेटून सांगितलं की मला आपल्या शाळेसाठी 6000 रुपयांची वस्तू द्यायची आणि ती ही याच वर्षी नाही तर दरवर्षी द्यायची आहे, त्यांचा तो उदात्त हेतू बघून आम्ही शिक्षक ही प्रेरित झालो आणि प्रत्येकी 11000 रुपयांची देणगी देण्याचे ठरवले हे बघून गावातील लोक ,माजी विद्यार्थी या सर्वानीच शाळेला भरगच्च 6,50,000 हजार रुपायांची देणगी जमा करण्यात आली तर बघता बघता शाळा खूप सुंदर बनली पण आज चार वर्षे झाली तरीपण ज्यांनी देणगी देण्याची सुरुवात केली ते विसरले नाही तर आज ही त्यांना न मागता, कधी फोन न करता 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनी शाळेला देणगी देत आहेत ते पण प्रत्यक्ष फोन लाऊन सर शाळेसाठी 6000 /- रु.पाठवतोय अशी सर्वांसाठी प्रेरणा देणारे रंगनाथ अप्पा तिळकरी. म्हणूनच म्हणावे लागते मोठ्या मनाचे मोठे श्रीमंत व्यक्तिमत्व या ईटोलीगावांचे शाळेसाठी दरवर्षीच सर्वांनी मदत देण्याचे नुसतेच जाहीर केले नसुन 2019 पासुन आज पर्यंत माजी विद्यार्थांची शाळेला न चुकता मदत सुरु आहे.

# येसगाव नं. २ येथे स्वच्छता अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील येसगाव नं२ येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. ग्रामपंचायत,मंदिर, गाव परिसरात ठिकठिकाणचा केरकचरा उचलून गाव व परिसरातील स्वच्छता करण्यात आली.सरपंच ग्रामपंचायत सदस्य पदाधिकारी ग्रामस्थ यांनी यात सहभाग घेत गाव व रस्ते परिसर चकाचक केले. येसगाव नं२ स्वतंत्र ग्रामपंचायत झाली व गावाचा चेहरा मोहराच बदलून गेला आहे. ग्रामपंचायत कार्यालय नवी इमारत, दोनतीन मंदिरे, वोटे, संरक्षण भिंत, कमान, सिमेंट रस्ता आदि व अन्य अनेक विकासात्मक कामे नुकतेच झाली तर सर्वांची रंगरंगोटी व स्वच्छता बघता गाव सुंदर वैभव पुर्ण दिसून येत आहे. महिला सरपंच रेणुका अरुण खंडागळे व महिला ग्रामसेविका मुळे मॅडम दोन्ही महिला येथे ग्रामपंचायतीचे काम बघत असल्याने गाव सुंदर व चकचकीत करत विकासात्मक कामे करत असल्याने सर्वसामान्यातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# उल्हासनगर येथे भव्य व आगळावेगळा महिला मेळावा व हळदीकुंकू समारंभ



आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** उल्हासनगर कॉंग्रेस महिला अध्यक्षा मनीषा महाकाळे व निराधार निराश्रित व्यक्ती विकास विभाग अध्यक्षा प्रा सिंधु रामटेके यांच्या संकल्पनेतून उल्हासनगर कॉंग्रेस जिल्हा अध्यक्ष रोहित साल्वे यांच्य मार्गदर्शना खाली सार्वजनिक हॉल लालचक्की येथे महिला मेळावा व हळदीकुंकू समारंभ घेण्यात आला.

ह्या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे यात राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस हार चढवून, सर्व महानायीकांचे स्मरण करुन,नंतर महिलांना वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन व प्रबोधन करण्यात आले, तसेच महिलांना संविधानाचे वाचन करून शपथ देण्यात आली. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या हळदीकुंकू समारंभास विवाहित महिलांसोबत विधवा महिलांनाही आमंत्रित करण्यात आले होते व त्यांनाही वाण देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी महिला अत्यंत भावूक झाल्या होत्या.हळदीकुंकू समारंभा नंतर महिलांनी झिम्मा व फुगडी खेळून आपला आनंद साजरा केला.

यावेळी कॉंग्रेसच्या, मा.नगरसेवीका अंजली साळवे,माजी मुख्याध्यापीका विजया मोरे, इनरव्हील क्लबच्या माजी अध्यक्षा टिना ठाकुर, विशाल सोनावणे, संतोष मिंडे, दीपक सोनावणे, राकेश मिश्रा, अनिल यादव, अन्सार शेख, मंगेश हिवराळे, पुषोत्तम महाडिक तसेच कॉंग्रेसच्या जेष्ठ पदाधिकारी कमलताई वेलकुंडे, सचिव मालती गवई, कालिंदी गवई, विजया गाडे, सुधा जोगळेकर, मानसी पाटकर, मदीना शेख, मनीषा नगारे, कुसुम महाकाळे, संध्या महाकाळे,आशा कोलगे, मेघा कोलगे, दिपा महाकाळे,काजल महाकाळे यांनी आपले सहकार्य दिले यावेळी ९५० महिला उपस्थित होत्या.

# मीरा सपकाळे यांचा गगन मलिक यांच्या हस्ते गौरव



आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** बुद्धभूमी फाउंडेशन, शांतीनगर, उल्हासनगर, वालधुनी येथे त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांचा दोन लाख रुपये खर्चून भव्य पुतळा दान करणाऱ्या शोषित-पीडित कष्टकरी महिला व कष्टकरी महिलांसाठी अहोरात्र काम करणाऱ्या बुद्धभक्त, महामाया असंघटित महिला कामगार संघटनेच्या अध्यक्षा मीराताई सपकाळे यांचा गौरव श्री गौतम रत्न भन्ते जी यांच्या उपस्थितीत माननीय गगन मलिक यांच्या हस्ते सन्मान प्रदान करण्यात आला.गगन मलिक हे एक भारतीय अभिनेता आणि बौद्ध कार्यकर्ता आहे.

संकट मोचन महाबली हनुमान यांना भगवान रामाच्या भूमिकेसाठी संयुक्त राष्ट्रांनी आयोजित केलेल्या जागतिक बौद्ध चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला. "श्री सिद्धार्थ गौतम" चित्रपटाची निर्मिती करणारे नवीन गुणरत्ने यांच्यासह आदर्शवादी अभिनेता गगन मलिक यांनी द लाइट ऑफ एशिया फाउंडेशन या संस्थेने बौद्ध धर्माच्या मूलभूत तत्त्वांवर आधारित "लोटस वर्ल्ड" प्रकल्प सुरू केला आहे. गगन मलिक जी कल्याण आणि उल्हासनगर मध्ये धम्माच्या प्रचारासाठी दाखल झाले होते.



# दहावी व बारावी विद्यार्थिनींचा निरोप समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** न्यू इंग्लिश स्कूल व जूनियर कॉलेज मुलींचे लोणंद, ता. खंडाळा या विद्यालयातील इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थिनींचा निरोप समारंभ सोहळा विद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात संपन्न करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षास्थानी विद्यालयाच्या प्राचार्या सुनंदा नेवसे व प्रमुख पाहुणे म्हणून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विद्यालय नायगावचे प्राचार्य नंदकुमार कोकरे हे उपस्थित होते.विद्यार्थिनींना पुढील वाटचालीसाठी मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले. तसेच बोर्ड परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. प्राचार्य नंदकुमार कोकरे यांनी आपल्या भाषणामध्ये विद्यार्थिनींना महिला क्रांतिकारकांची उदाहरणे देऊन सावित्रीबाईच्या लेकींनी सावित्रीबाईचा वसा व वारसा पुढे चालववा. अथक परिश्रम करून येणाऱ्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करावे.असे विचार मांडले.अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्या सुनंदा नेवसे म्हणाल्या की,मुलींनी मोबाईलच्या जास्त आहारी न जाता सद्यस्थितीत फक्त अभ्यासाकडेच लक्ष केंद्रित करावे व योग्य त्या विद्या शाखेमध्ये प्रवेश घेऊन, प्रथम आपले करिअर घडवावे.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववी मधील मुलींनी केले. प्रास्ताविक कोरडे मॅडम यांनी केले.शिक्षक मनोगत प्राध्यापक इंगवले सर रासकर सर व वगरे मॅडम यांनी व्यक्त केले.आभार प्राध्यापक सरोदे मॅडम यांनी मांडले.



# एपीआय शेंकडे यांचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**कुंडलवाडी :** येथील पोलीस ठाण्यात नव्याने रुजू झालेले सहाय्यक पोलीस निरिक्षक संतोष शेंकडे यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी उपस्थित शहरातील शिवसेना शिंदे गट शहर प्रमुख लक्ष्मण गंगोने युवा सेना शहर प्रमुख गंगाधर शिंदे उप शहर प्रमुख चंद्रशेखर भोरे OBC शहर प्रमुख सुरेश राजेडवार शहरं संघटक व्यंकट श्रीरामे SC शहर प्रमुख संतोष कंपाले इस्माईल शेख ईशू अन्नाराव पाटील शिवकुमार गंगोने निलिख सुर्यवंशी निखील तोटावार अजय कर्पे साईनाथ भुरावार दत्ता धुबनरे व सर्व शिवसैनिक उपस्थित होते.



# बँकांकडून शेतकऱ्यांना कर्जाच्या नोटीसा

## नोटीसा पाठविणे बंद करा; सभापती चव्हाण यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात यंदा राज्य शासनाने दुष्काळ जाहीर केला असतानाही बँकांकडून कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांना नोटिसा पाठविण्याचा सपाटा सुरू आहे. मार्च अखेरीच्या वसुलीसाठी बँका शासन नियम पायदळी तुडवून शेतकऱ्यांना वेठीस धरत असल्याने तीव्र संताप सोयगाव पंचायत समितीचे सभापती धरमसिंग चव्हाण यांनी व्यक्त केला आहे. त्या बंद केल्या पाहिजेत असे बोलताना सांगितले. दरम्यान, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना अशाच प्रकारे नोटिसा मिळत असल्याच्या तक्रारी करण्यात येत आहेत. सोयगाव तालुक्यात व सावळदबारा परिसरात तालुक्यात यंदा दुष्काळ जाहीर झाला आहे. त्यामुळे बीजबिल वसुली, शेतऱ्यांकडील सक्तीची थकबाकी वसुली यावर निबंध आलेले आहेत. नियमानुसार या ठिकाणी सक्तीची कर्जवसुली करता येत नाही.असे पण सभापती चव्हाण यांनी बोलताना सांगितले आहे. परंतु सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना सध्या सरकारी बँकांकडून कर्जवसुलीच्या नोटिसा येत आहेत. मार्चअखेरीमुळे बँकांची आतापासूनच बसुली मोहीम सुरू झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर कर्जवसुलीसाठी नोटिसा पाठविण्याचा सपाटा बँकांनी लावला आहे.काय म्हटले नोटीसमध्ये ? शेतकऱ्यांना बँकांकडून नोटिसा पाठविण्याचा सपाटा सुरू असून, त्यात कृषिकर्जाचे पैसे व्याजासह न भरल्यास न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागेल, असा इशारा बॅककडून देण्यात आला आहे. अनेक शेतकऱ्यांना अशा प्रकारच्या नोटिसा येत असल्याने दुष्काळ नावालाच जाहीर झाला आहे का, असा संतप्त सवाल शेतकऱ्यांनी व्यक्त होत आहे.
दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांकडून बँकांनी सक्तीची कर्ज वसुली तसेच महावितरणने वीजबिल वसुली न करण्याच्या सूचना आहेत. बँकांकडून कर्ज वसुलीच्या नोटिसा शेतकऱ्यांना देण्यात येत असल्याची माहिती प्राप्त झाली त्या नोटीसा शेतकऱ्यांना बजावल्या आहेत त्या बंद झाल्या पाहिजेत अशी माहिती सोयगाव पंचायत समितीचे सभापती धरमसिंग चव्हाण यांनी बोलताना सांगितले आहे.

# युवा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. कवठे

आधुनिक केसरी न्यूज



**गडचिरोली :** गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीच्या वतीने २१ व २२ फेब्रूवारीला युवा साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाध्यक्ष म्हणून राजूरा येथील सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.किशोर कवठे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. गोंडवाना विद्यापीठात आयोजित या दोन दिवसीय साहित्य संमेलनात विदर्भ-राज्यातील साहित्यिकांचा सहभाग राहणार असून परिसंवाद, कवी संमेलने, मुलाखत यासह भरगच्च साहित्यिक कार्यक्रमाचा समावेश आहे.
चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा येथील डॉ.किशोर कवठे शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत अध्यापक असून कवी, स्तंभलेखक, निवेदक म्हणून सर्वत्र सुपरिचित आहेत. त्यांचे बहुचर्चित पसरत गेलेली शाई, दगान, गावसूक्त, विराणी हे काव्यसंग्रह, ऐसा चेतला अभंग हा संपादित अभंगसंग्रह, दिशा अंधारल्या जरी हा ललित संग्रह, संवेदनशील लोकनेता दादासाहेब देवतळे हा चरित्रसमीक्षा ग्रंथ आदी पुस्तके प्रकाशित आहे. त्यांच्या विविध पुस्तकांना राज्यातील नामांकित पुरस्कारांनी गौरविले आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात अक्षर साहित्य कला प्रतिष्ठानच्या माध्यमातून साहित्यिक, सामाजिक योगदान डॉ.कवठे यांनी दिले आहे.

# प्रियकराने थेट प्रेयसीच्या अंगावर घातली कार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** प्रेयसीला लग्नाचे आमिष दाखवून नातेवाईक तरुणीशी लग्न करणाऱ्या प्रियकरावर तरुणीने बलात्काराचा गुन्हा दाखल केला. त्या गुन्ह्यात तो दोन महिने कारागृहात होता. परंतु, कारागृहातून सुटताच त्याने प्रेयसीला कारने धडक देऊन चिरडण्याचा प्रयत्न केला. कारच्या धडकेत प्रेयसी थोडक्यात वाचली. या प्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. राज ऊर्फ राघवेंद्र राधेश्याम यादव (३१, वासूदेवनगर, हिंगणा) असे आरोपीचे नाव आहे. आरोपी राघवेंद्र यादव या वाहतूकदार असून त्याची पीडित २३ वर्षीय तरुणीशी इंस्टाग्रामवरून ओळख झाली होती. २०२० पासून त्यांची मैत्री होती.

# मल्हारी मार्तंड भैरव मंदिरात मूर्तीप्राण प्रतिष्ठा स्थापना

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**



**लोणंद :** माणदेशी पठारावर वसलेल्या तोंडले ता.माण येथील मल्हारी मार्तंड भैरव मंदिरात मूर्तीप्राण प्रतिष्ठा स्थापना करण्यात आली. पारंपरिक गजी नृत्य आणि हलगीच्या तालावर हा सोहळा अगदी दिमाखात संपन्न होत असताना तोंडले सह आसपासच्या व विविध भागांतून आलेल्या भक्तांनी हजेरी लावली होती. भंडाऱ्याची उधळण करीत खंडोबा म्हाळसा बाणाईदेवी या नव्या मूर्तिंची भव्य ग्रामप्रदक्षिणा करण्यात आली.प्रख्यात ज्योतिषतज्ञ पंडित प्रवीण राजगुरू गुरुजी आणि जेजुरी खंडोबादेवता उपाध्य पुजारी श्लोक हरिश्चंद्रे यांच्या हस्ते हा सोहळा पार पडला.पंडित राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली अच्युत गुरव गुरुजी, हनुमंत डोळे उपाध्य शैवब्राम्हण पुजारी यांनी वेदविधी सह धार्मिक विधी केले.सात जोडप्यांच्या हस्ते होमहवन संकल्प करण्यात आला.खंडोबाचा जयजयकार भाविकांकडून करण्यात आला.फटाक्याच्या आतिषबाजी करण्यात आली.सडा रांगोळीने स्वागत करण्यात आले.तोंडल गावातील समस्त ग्रामस्थांनी आपल्या परिश्रमातून या मंदिराची निर्मिती केली असून हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी ग्रामस्थांनी विशेष मेहनत घेतली.आयोजक उत्तम खरात, विनोद चव्हाण, किसन बलीप, बीबीशन सतरे, किसन जाधव, महेश बलीप राजू खरात विनोद घाडगे अण्णा खरात यांनी विशेष कामगिरी पार पाडली. चित्रपट निर्माते राजू बरकडे यांनी विशेष साहाय्य केले.भाविकांनी या सोहळ्यात सहभागी झाल्याबद्दल आयोजकांनी सर्व भाविकांचे विशेष आभार मानत समाधान व्यक्त केले.

# हरिभाऊ राऊत यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज




**जामनेर :** पहूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील क्रीडा शिक्षक तथा पत्रकार हरिभाऊ राऊत यांना महात्मा ज्योतीराव फुले राज्यस्तरीय शिक्षक पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले .
धुळे येथील राजश्री शाहू महाराज नाट्यगृहात महात्मा ज्योतिराव फुले राष्ट्रीय व राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा व शिक्षण परिषद आयोजित करण्यात होती. यावेळी माजी खासदार तथा राज्य सैनिकी शाळा असोसिएशनचे अध्यक्ष ब्रिगेडियर सुधीर सावंत, पोलीस उपाधीक्षक एल.एन.कानडे (नाशिक), सहकार भारतीचे राष्ट्रीय संपर्कप्रमुख दिलीप पाटील यांच्या हस्ते पहूर येथिल महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील क्रीडा शिक्षक हरीभाऊ राऊत यांना महात्मा ज्योतीराव फुले शिक्षक परिषद महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे दिला जाणारा राज्यस्तरीय शिक्षक पुरस्काराने सहपरिवार व सहकारी यांच्या सह सन्मानित करण्यात आले. यावेळी हरीभाऊ राऊत यांच्या समवेत प्रतिभा राऊत, शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका कल्पना बनकर, वडाळी गावचे सरपंच संजय बनसोडे, शंकर भामेरे, भगवान जाधव, चंदेश सागर सादीक शेख आदींनी हा सन्मान स्वीकारला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा धरती देवरे, आ.सत्यजित तांबे, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा पूजा खडसे, राज्य सैनिकी फेडरेशनचे सचिव तथा निवृत्त सुभेदार मेजर पी.डी.निंबाळकर, माजी सैनिक तथा आरटीओ इन्स्पेक्टर मुकेश देवरे (नंदुरबार) महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषदेचे प्रदेशाध्यक्ष व्यंकटराव जाधव, प्रदेश कार्याध्यक्ष डॉ. शिवाजी पाटील, प्रदेश मुख्य कोषाध्यक्ष गजेंद्र कानडे, विभागीय अध्यक्ष डॉ. पंकज शिंदे, जिल्हा सचिव अभय नंदन आदी उपस्थित होते. राज्यस्तरीय शिक्षक पुरस्कार आपल्या विद्यालयाला मिळाला त्या बद्दल बाबुराव आण्णा घोंगडे, उपाध्यक्ष शांताराम पाटील, सचिव भगवान आण्णा घोंगडे संचालक अशोक बनकर, शंकर घोंगडे, लक्षण गोरे, ज्ञानेश्वर लहासे, सुकदेव गिते, समाधान पाटील, शेख युसुब, वंदना वानखेडे मुख्याध्यापिका वैशाली घोंगडे सर्व शिक्षक वृंद पालक यांनी अभिनंदन केले.

# पोपटाला वाचवण्यासाठी मेट्रो धावली

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मकर संक्रातीचा सण संपून महिना लोटला आहे. आकाशात पतंगांचा वावर कमी झाला असला तरी मांजा मात्र जागोजागी अडकला आहे. किंबहुना पक्षांसाठी हा मांजा मृत्यूचा सापळाच ठरत आहेत. नागपूर शहरातील कामठी मार्गावर असलेल्या मेट्रोच्या पुलावरील रेलिंग (सुरक्षा कठडे) मध्ये गुंडाळलेल्या मांज्यात एक पोपट अडकला होता. सेमिनारी हिल्सवरील वनखात्याच्या ट्रान्झिट ट्रिटमेंट केंद्राच्या बचाव पथकाचे जवान आणि अग्निशमन दलाच्या जवानांना त्या पोपटाला वाचवणे अशक्य वाटत होते. खूप उंचावर तो अडकला असल्याने त्याला काढण्यासाठी अग्निशमन विभागाला बोलावण्यात आले, पण त्यांचीही शिडी त्या पोपटापर्यंत पोहचत नव्हती. बचाव पथकाचे हरीश किनकर, वनमजूर रवी मिटकरी, ट्रान्झिटचे बंडू मंगर, स्वप्निल भुरे हे पुन्हा त्याठिकाणी गेले. हरीश किनकर यांनी जवळ असलेले गड्डीगोदाम मेट्रो स्थानक गाठले. तिथल्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला.

# घोडेगाव येथील इयत्ता दहावी व बारावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील घोडेगाव येथील राजमाता जिजाऊ वरीष्ठ महाविद्यालय, राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय,सद्गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालय, स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय घोडेगाव, ता. खुलताबाद जि.औरंगाबाद येथे आज मा.साईनाथ पाटील जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता दहावी व बारावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला.
आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रशासकीय अधिकारी संदिप जाधव सर हे होते.तर मुख्य अतिथी म्हणुन श्री.के.एन.इंगळे (कृषी अधिकारी खुलताबाद), माजी उपसरपंच तथा तंटामुक्ती अध्यक्ष श्री. दादासाहेब जाधव, संस्थेचे पदाधिकारी श्री. प्रकाश जाधव, श्री. द्वारकादास जाधव, श्री.सोनवणे (ग्रामसेवक), श्री. सदावर्ते (कृषी सहाय्यक) ग्रामपंचायत सदस्य श्री.राजु आवारे,श्री.गणेश आधाने, श्री.गणेश घोडके , माजी उपसरपंच श्री मच्छिंद्र जाधव, श्री. सुरेश गोरे हे होते. दीपप्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य श्री.डी.डी.घुगे सर यांनी केले. श्री. इंगळे यांचे भाषण झाले. त्यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. यानंतर श्री.प्रकाश जाधव, श्री.दादासाहेब जाधव यांचे भाषण झाले. आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष संदीप सर यांनी विद्यार्थ्यांना खुप सुंदर असे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती ठाकूर मॅडम, श्री. तुकाराम जाधव सर, तर आभार श्री नलावडे सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य ,मुख्याध्यापक, प्राध्यापक , शिक्षक ,शिक्षकैतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.



# जरंडी परिसरात जुगारमुळे शालेय विद्यार्थ्यांना त्रास

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील जरंडी येथील परिसरात तळीरामांचा व जुगार खेळणाऱ्या इसमांचा परिसरातील महिला व शालेय विद्यार्थिनींना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या संदर्भात जरंडी ग्रामपंचायत ने सोयगाव पोलीस ठाणे येथे वेळोवेळी कळविले असून सुधा सोयगाव पोलीस ठाणे कारवाई करीत नसल्याने जरंडी परिसरातून प्रशासनावर रोष व्यक्त करण्यात येत आहे.सोयगाव - बनोटी राज्य रस्ता क्रमांक २४ वर जरंडी परिसरासह गावात मोठ्या प्रमाणात जुगार खेळविल्या जात आहे. त्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर येत आहे. तसेच शालेय विद्यार्थी देखील व्यसनाच्या आहारी जात आहे. याकडे पोलीस प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे परिसरातून बोलले जात आहे. जुगार खेळविण्यासाठी खान्देश मधील पाचोरा तालुक्यातून सूत्र हालत असल्याचे बोलले जात आहे.

जरंडी, निंबायती, न्हावी तांडा, रामपूर तांडा, बहुलखेडा, कवली, माळेगाव पिंप्री परिसरात पाचोरा तालुक्यातून जुगार खेळविला जात आहे. याकडे पोलिसांचे देखील अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याचे सांगितले जात आहे. जरंडी गावात महात्मा फुले महाविद्यालय रस्त्यावर जि. प. प्राथमिक शाळे व फुले महाविद्यालय रस्त्यावर जि. प. प्राथमिक शाळेच्या हाकेच्या अंतरावर जुगार खेळविल्या जात असल्याने खेळणारे मुख्य रस्त्यावरच ठाण मांडून बसलेले असतात. त्यामुळे महिलांसह शालेय विद्यार्थिना त्रास सहन करून प्रवास करावा लागत आहे. या संदर्भात ग्रामपंचायत कार्यालय जरंडी यांनी ठराव घेऊन प्रशासनाला पत्र व्यवहार केला होता. परंतु त्यावर कारवाई तर नाहीच उलट अवैद्य धंदेवाईकाना पाठीशी घालत असल्याचे बोलले जात आहे. तरी यावर कोण कारवाई करणार या संदर्भात चर्चेला उधान आले आहे.

सोयगाव, आमखेडा, बनोटी व गोंदेगाव या ठिकाणाहून देशी व विदेशी दारू जरंडी गावासह परिसरात पुरविल्या जात असल्याने अनेकांचे संसार उघड्यावर येत आहे. तसेच शालेय विद्यार्थी देखील व्यसनाच्या आहारी जात आहे. बनोटी व गोंदेगाव तसेच सोयगाव व आमखेडा येथील देशी दारू दुकानदार हे देशी व विदेशी दारू मोटारसायकल व चार चाकी वाहनाने पोहच करीत असल्याचे परिसरातून बोलले जात आहे. तसेच मागील काही दिवसापूर्वी देखील सोयगाव पोलिसांना सोयगाव येथून देशी दारू घेऊन जात असलेल्या मोटार सायकल वर कारवाई केली होती. तरी देखील अद्याप जरंडी परिसरात देशी दारू पोहचाविल्या जात असल्याचे दिसून येत आहे.



# मेरा बु. येथे आरोग्य शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**राजेंद्र मोरे**

**चिखली :** तालुक्यातील मेरा बु.येथे नुकतेच ग्राम पंचायत व गोदावरी फाउंडेशन जळगांव यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिराचा परिसरातील शेकडो रुग्णांनी लाभ घेतला असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक येथे दिनांक 12 फेब्रुवारी 2024 रोजी ग्रामपंचायत कार्यालय मेरा बुद्रुक व गोदावरी फाउंडेशन जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ ग्रामपंचायत मेरा बुद्रुकला तीन वर्षे कार्यकाळ पूर्ण झाला यानिमित्ताचे अवचित्य साधून भव्य आरोग्य शिबीर मोठ्या उत्साहात संपन्न झाले. या भव्य आरोग्य शिबिराच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मेरा बुद्रुक गावचे सामाजिक कार्यकर्ते परशुअण्णा पडघान हे होते तर, उद्घाटक डॉ.रिंगे हे होते. प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक चिखली तालुका आरोग्य अधिकारी डॉ.रिंगे होते. या भव्य आरोग्य शिबिराचे आयोजक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बुलढाणा उपाध्यक्ष गजानन वायाळ हे होते. या अगोदरही गजानन वायाळ यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने सर्व ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी वृंद यांच्या अनमोल सहकार्याने वेगवेगळ्या प्रकारचे ग्रामपंचायतच्या वतीने आरोग्य शिबिर घेण्यात आले होते. परंतु या भव्य आरोग्य शिबिरामध्ये मोफत ईसीजी कार्डिओग्राफ, रक्तदाब तपासणी, मुतखडास, मूत्रपिंडातील खडे, प्रोस्टेट ,पित्ताशय खडा, स्वादुपिंड, छोट्या गाठी ,मुळव्याध, हायड्रोसिल, अंडाशय शस्त्रक्रिया, भगंदर पित्ताशयाचे खडे पायातील शिरा फुटणे मूत्रपिंडाचे आजार पोट व आतड्यांच्या शस्त्रक्रिया कर्करोग निदान, बालरोग शस्त्रक्रिया, मेंदू मनका फक्चर, नाक ,कान, घसा शस्त्रक्रिया, नेत्रालय ,हृदयरोग, जनरल मेडिसिन, गर्भपिशवी ,अस्थिरोग, मानसोपचार इत्यादी रोगावर तपासणी व मार्गदर्शन मोफत करण्यात आले.



# कनकशीळ आरोग्य केंद्रातर्फे राष्ट्रीय जंतनाशक मोहीम यशस्वी

आधुनिक केसरी न्यूज

**कनकशीळ :** बालकांमध्ये आढळणाऱ्या कृमीदोषाचे गांभीर्य लक्षात घेता तो समूळ नष्ट करण्यासाठी शासनातर्फे विविध उपक्रम राबवले जातात त्याचा एक भाग म्हणुन १३ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय जंतनाशक दिवस म्हणुन साजरा केला जातो. त्याचेच औचित्य साधुन आरोग्य वर्धिनी केंद्र कनकशिळ च्या वतीने १ते१९ वर्ष वयोगटातील बालकांसाठी परिसरातील 4 जिल्हा परिषद शाळा आणि 6 अंगणवाडी येथे हि मोहिम राबविण्यात आली त्यात एकूण ५६६ बालकांना आरोग्य कर्मचारी आणि शिक्षक यांच्या निगराणीखाली अल्बेंडाझॉल ही कृमिनाशक गोळी देण्यात आली. यावेळी बोलतांना समुदाय आरोग्य अधिकारी डॉ रमेश शेळके म्हणाले की "केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मातीतून प्रसारित होणाऱ्या कृमीदोषाचे प्रमाण महाराष्ट्रात २९% (२४१ दशलक्ष) आढळले आहे. त्याच अनुषंगाने राज्यात 'राष्ट्रीय जंतनाशक दिन' वर्षातून दोनदा राबविण्यात येत आहे, जंतनाशक मोहिमेमुळे अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे होणार आहेत. त्यामध्ये बालकांमधील रक्तक्षय, अशक्तपणा व कुपोषणावर नियंत्रण तसेच बालकांचा बौद्धिक व शारीरिक विकास होणे याचा समावेश आहे.

या मोहिमेसाठी कनकशीळ, कानडगाव, रेल इंदापुर येथील शिक्षक, अंगणवाडी सेविका,मदतनीस यांनी सहकार्य केले. उकेंद्रातर्फे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. रमेश शेळके, विजय जाधव, अनिल बनकर, ज्योती चिमणे, हिरा दांडगे, सुनीता निकम, अनिता मुरकुंडे, अरुणा जाधव यांनी मोहीम यशस्वी केली.

# लोहा शहरात अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील शिवकल्याण नगर येथे दि.१५-२-२०२४ ते२२-२-२०२४ दरम्यान विराट विश्वकर्मा व शिवजयंती महोत्सव निमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ दि .१५-२-२०२४ रोजी हभप श्री चंद्रकांत महाराज आंडगेकर यांच्या किर्तनाने होणार असुन आठवडाभर भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि.१६ रोजी हभप श्री शिवप्रसाद हांडे महाराज यांचे किर्तन, दि.१७ रोजी श्री वेंदाताचार्य हभप बालाजी महाराज पांचाळ यांचे किर्तन, दि. १८ रोजी हभप भालेराव गुरुजी महागावकर यांचे किर्तन , दि.१९ रोजी हभप मोतीराम महाराज उमरथडीकर यांचे किर्तन, दि. २० रोजी हभप आत्माराम महाराज रायवाडीकर यांचे किर्तन,दि.२१ रोजी हभप सखाराम महाराज पालमकर यांचे किर्तन, दि.२२ रोजी हभप नादब्रह्म सदानंद महाराज रायवाडीकर यांचे काल्याचे किर्तनाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

तसेच सदरील कार्यक्रमात महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकार, कथाकार, गायक, वादक व गुणीजन मंडळी राहणार आहेत तसेच लोहा,हळदव, कारेगाव, किरोडा, कळका, बाभुळगाव, गगणबीड, पिंपळगाव, धानोरा, चितळी, आंडगा, दगडसांगवी, रायवाडी, बनवस, माळाकोळी, परिसरातील सर्व गायनचार्य, मृदंगाचार्य, भजनी मंडळी उपस्थित राहणार आहेत. यावेळी भगवताचा व काल्याचा प्रसाद सार्वजनिक होणार असून तेव्हा या कार्यक्रमाचा लाभ सर्व भक्तांनी घ्यावा व इच्छेनुसार अन्नदान करावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बाजार सावंगी येथील किशोर काटकर यांचे स्पर्धा परीक्षेत यश संपादन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील किशोर दशरथ काटकर यांनी नुकतेच स्पर्धा परीक्षेमध्ये यश संपादन केले असून त्यांची आरोग्य सेवक पदी निवड झाली आहे किशोर काटकर यांची घरची परिस्थिती अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये गरीब परिस्थितीतून संघर्ष करून यश मिळवले आहे.

यावेळी पोपट काटकर कारभारी नलावडे भूषण काटकर केतन काटकर मनोहर धोंडकर त्यांनी यांचा सत्कार करून अभिनंदन केले त्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरांमध्ये त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# सेवानिवृत्त अभियंता कानिंदे यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** आंबेडकर चळवळीतील सेवानिवृत्त अभियंता भरतकुमार कानिंदे यांनी थायलंड येथे एक महीना श्रामणेर दिक्षा घेऊन, जागतिक शांतता रॅली मध्ये सहभागी होउन मायदेशी परतल्याने त्यांचा नूकताच सत्कार करण्यात आला आहे. बौद्धी वृक्ष विहार एअर इंडिया कॉलनी, सांताक्रूझ मुंबई येथे, भारतीय बौद्ध महासभा, पानगाव मित्रमंडळ व माता रमाई महिला मंडळच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण गावडे, प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक नारायण येरेकर, कस्टम कमिशनर राजेश मुंडे, गोविंद कानिंदे, ॲड. किशोर डोके, प्रदिप लोखंडे, पल्लवी पाटील-मुंडे,उत्तम मुनेश्वर, दामोदर येरेकर , श्रीपद पांडवे, विशेष उपस्थिती दत्ता भवार, संजय पाटील, सदानंद घुले यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी देविदास मुनेश्वर, प्रल्हाद मुनेश्वर, सिध्दार्थ गायकवाड, ,बाबासाहेब सोनवणे,विष्णू गवळी यांनी परिश्रम घेतले. श्री. कानिंदे यांनी थायलंड मधील अनुभव कथन केले. सुत्रसंचलन वर्षा लोखंडे व विद्या लोखंडे यांनी केले.भन्ते बोधानंद यांनी धम्म देशना देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली..



# सेवालाल महाराज जयंती मोठ्या थाटामाटात साजरी करा : सरपंच वरदानसिंग चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा तांडा परिसरात आज 15 फेब्रुवारी २०२४ रोजी संत सेवालाल महाराज यांच्या जीवनावर समाज प्रबोधन महाप्रसाद भोग घरोघरी दिवे लावून येणाऱ्या तरुण पिढीला जागृत करा असे आवाहन सरपंच वरदानसिंग चव्हाण नांदा तांडा यांनी केलेले आहे. क्रांतिकारी सद्गुरु सेवालाल महाराज यांची बंजारा समाजाचे संत सेवालाल महाराज यांच्या आईचे नाव धरमणी होते. ती जयराम वडतीया (सुवर्णा कप्पा, कर्नाटक) यांची राजकन्या होती. भीमा नायक यांच्या लग्नानंतर त्यांना जवळजवळ १२ वर्षे मूलबाळ नव्हते, पुढे जगदंबा मातेची पूजा व कृपेमुळे धर्मनी व भीमा नाईक यांना सेवालाल महाराज यांचा जन्म झाला अशी बंजारा समाजात एक श्रद्धा आहे.

संत सेवालाल महाराज यांचे श्रीक्षेत्र रुईगड येथे निधन



झाले. आणि महाराष्ट्र राज्यातील वाशिम जिल्ह्यातील पोहरागड येथे त्यांची समाधी आजही जगदंबेच्या मंदिराशेजारी आहे. आध्यात्मिक आणि समाजप्रबोधनातून समाजाला दिशा देण्याचे कार्य केले. सेवालाल महाराज यांची भविष्यवाणी आजही काळाच्या कसोटीवर तंतोतंत खरी ठरली आहे.

बंजारा समाजातील महायोद्धा राजा लखीशाह बंजारा, गोर राजाभोज, क्रांतिकारी संत गोविंद गुरू बंजारा, बाबा मख्खनशाह बंजारा, शूरवीर बल्लुराय बंजारा, वीरांगना मल्लिका बंजारन, गोरा बादल, आला उदल, नायक मनिसिंह पवार, राजागोपीचंद गोर, वीरांगना दूर्गावती बंजारन, वीर दुर्गादास राठोड, जयमल फत्ता सिंह या शुर पराक्रमीच्या इतिहासाच्या शौर्यगाथा आजही बंजारा साहित्य बरोबरच शिख इतिहासात सुद्धा दिसून येते.

# सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून रुग्णांना आधुनिक वैद्यकीय सुविधा

## १३०७ रुग्णांवर मेघे रुग्णालयात होणार विनामूल्य उपचार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** नागरिकांना अत्यंत माफक दरांमध्ये अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे काळाची गरज आहे. कोविड महासाथीच्या काळात आरोग्य यंत्रणेचे महत्त्व संपूर्ण जगाला कळले. अशात गरीबांना परवडतील अशा माफक दरात आरोग्य सुविधा पुरविणे हे आद्य कर्तव्य असल्याची जाण ठेवत राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून मूल येथे हजारो नागरिकांची निःशुल्क आरोग्य तपासणी करण्यात आली. सुधीर मुनगंटीवार तथा वर्धा येथील दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने मुल येथे महाआरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात ३ हजार १२७ रुग्णांची नोंदणी करण्यात आली. त्यानंतर कर्मवीर महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. तपासणीदरम्यान पुढील वैद्यकीय उपचारांची गरज असलेल्या १ हजार ३०७ रुग्णांना वर्धा येथील दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्थेच्या इस्पितळात दाखल करण्यात येणार आहे. मुल येथील कर्मवीर महाविद्यालयात आयोजित महाआरोग्य शिबिरासाठी दत्ता मेघे आयुर्विज्ञान संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. अभ्युदय मेघे यांनी सहकार्य केले. ना. श्री. मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून घेण्यात आलेल्या या शिबिरात तपासणीनंतर उपचारांची गरज असलेल्या रुग्णांवर सावंगी मेघे येथील रुग्णालयात विनामूल्य उपचार करण्यात येणार आहे. मुल ते सावंगी मेघे येथे जाण्यासाठी रुग्णांना मोफत वाहन व्यवस्थाही उपलब्ध करून देण्यात येणार असून योग्यवेळी वैद्यकीय तपासणी व पुढील उपचाराबद्दल अनेक रुग्णांनी यावेळी मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त केले.



# भाजपा आ. गायकवाडसह चार जणांना कोठडी

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** भाजप आमदार गणपत गायकवाड यांना शहर प्रमुख महेश गायकवाड यांच्या वर केलेल्या गोळीबारा प्रकरणी ३ फेब्रुवारी रोजी न्यायालयाने १४ दिवसाची पोलिस कोठडी सुनावली होती पोलीस कोठडी संपत असल्याने त्यांना आज सकाळी उल्हासनगरच्या चोपडा न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. यांना १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

महेश गायकवाड यांच्यावर पोलीस स्टेशनमध्ये गोळीबार केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. न्यायालय परिसरात जमावबंदीचे आदेश देण्यात आले होते. यापूर्वी न्यायालय परिसरात घोषणाबाजी करणाऱ्या भाजपच्या ३० पेक्षा जास्त कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यातआले होते. उल्हासनगर गोळीबार प्रकरणी आमदार गणपत गायकवाड व इतर चार लोकांना कोर्टात सकाळी ९ वाजता हजर करण्यात आलं होतं. दोन्ही बाजूने तब्बल एक तास युक्तिवाद चालु होता दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून गणपत गायकवाड सह चार जणांना १४ दिवसाची न्यायालयीन कोठडीसुनावली आहे.

पोलिसांना अधिक पोलिस रिमांड कशासाठी हवी? याचे पुरावे त्यांनी कोर्टात सादर केले. तपास झालाय तेवढा पुरेसा आहे अधिक पोलीस कस्टडीची गरज नाही, असं आम्ही कोर्टसमोर मांडली. मात्र, कोर्टाने न्यायालयीन कोठडी सुनावली. आम्ही सर्टिफाईड कॉपी पाहून पुढील रणनिती ठरवू, असं आमदार गणपत गायकवाड यांचे वकील उमर काझी यांनी म्हटलं आहे.

# प्रा.शाम मानव यांचे 15 फेब्रुवारीला व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक संघटक, ख्यातनाम वक्ते व विचारवंत प्रा. शाम मानव यांचे भारतीय लोकशाही पुढील आव्हाने या विषयावर दिनांक 15 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 6.30 वाजता स्थानिक प्रियदर्शीनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात व्याख्यानाचे आयोजन आम्ही चंद्रपूरकर द्वारा करण्यात आले आहे. सदर व्याख्यानात विधान परिषद सदस्य शिक्षक मतदार संघ, नागपूर विभाग आमदार सुधाकर अडबाले हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवतील. प्रा. श्याम मानव देशातील बदलती सामाजिक, राजकीय स्थिती तसेच इतर विषयांवर आपल्या ओघवत्या शैलीत मांडणी करणार आहेत. या व्याख्यानाला चंद्रपूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक एड. गोविंद भेंडारकर, उमाकांत धांडे आणि चंद्रपुरातील विविध संघटनांनी केले आहे.

# कापूस उत्पादकांना न्याय देण्यासाठी जाचक अटी शिथिल कराव्यात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** कापूस उत्पादकांना न्याय देण्यासाठी शासनाने जाचक अटी शिथिल करून कापूस पणन महासंघाने मागितलेली परवानगी व कापूस खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या अर्थसहाय्यासाठी हमी घेणे आवश्यक आहे. कोरोना महामारीच्या विपरीत परिस्थितीत महाविकास आघाडी सरकारने कापूस खरेदी केला. पण सद्यःस्थितीत महायुतीचे सरकार शेतकऱ्यांना न्याय देण्यात अपयशी ठरले असून कापूस उत्पादकांना न्याय देण्याच्या दृष्टीने सरकारने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडे २५० ते ३०० लाख क्विंटल कापूस विक्रीसाठी उपलब्ध आहे. तरीही फक्त ११ लाख क्विंटल कापूस खरेदी करण्यात आली आहे. यावर्षी झालेल्या अवकाळी पावसामुळे कापसामध्ये ओलावा निर्माण होऊन त्याची प्रतवारी कमी झाली आहे. सी.सी. आय. च्या जाचक अटी व मापदंडामुळे कापूस खरेदी केला जात नाही. सद्यःस्थितीत कापूस उत्पादकांच्या घरात मोठ्या प्रमाणात विक्री करीता कापूस पडून आहे.

राज्यात १०९ खरेदी केंद्र प्रस्तावित असून त्यापैकी ९० केंद्रांना खरेदीची परवानगी देण्यात आली आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेतक-यांना हमीभावापेक्षा कमी दरात नाईलाजाने कापूस विकावा लागत आहे. आम्ही कापूस खरेदी करु, शेतकऱ्यांनी हमी भावापेक्षा कमी भावाने कापूस विकू नये, असे आवाहन उपमुख्यत्र्यांनी केले आहे. त्यामुळे कापूस उत्पादक संभ्रमात आहे. वडेट्टीवार म्हणाले की,कापूस पणन महासंघाचे मागील खरेदीच्या व्यवसायामधील रु. १०१.७२ कोटी केंद्र शासनाकडून येणे आहे. हा निधी प्राप्त झाल्यानंतरच पणन महासंघाकडून कापूस खरेदी प्रक्रिया सुरु होऊ शकते. त्यामुळे राज्य शासनाने हा निधी कापूस पणन महासंघाला तात्काळ उपलब्ध करुन दिला पाहिजे, तरच कापूस खरेदी करण्यासाठी कर्ज उपलब्ध होऊ शकेल.

# भोकर बंदला प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शासनाने मराठा आरक्षाचा अध्यादेश काढावा या मागणीसाठी जरांगे पाटील हे बेमुदत उपोषणाला बसले आहेत. बुधवारी सकल मराठा समाजाच्या वतीने भोकर बंद करून उपोषणास पाठिंबा दिला आहे. जरांगे पाटलांनी मागणीचा रेटा लावुन धरल्याने सरकारी पातळीवर हालचाली सुरू झाल्या असल्या तरी अद्याप अध्यादेश काढला नाही.तो त्वरित काढण्यात यावा या मागणीसाठी जंरागे पाटील यांनी बेमुदत ऊपोषण सूरू केले आहे.त्या उपोषणास पाठिंबा म्हणून शहरात सखल मराठा समाजाच्या वतीने बुधवारी भोकर बंद ठेवून पाठींबा दिला आहे. बंदला सर्व स्तरातून प्रतिसाद मिळाला आहे.

# भोकर येथील अवैधधंद्यांना पोलीसांची मूकसंमती; खुलेआम मटका

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहर व परिसरात मागील अनेक दिवसांपासून अवैध मटका, जुगार, गुटखा व्यवसाय फोफावले आहेत. सुशिक्षित, बेरोजगार यूवक, नागरिक यात गुरफटून गेल्याने अनेकांचे संसार उघड्यावर आलेत. खुलेआम व्यवसाय चालू असुनहि कार्यवाही केवळ कागदावरच आहे. पोलीसानी व्यवसायीकांना मुकसंमती दिल्याने शहर अवैध धंद्याच माहेरघर बनले आहे. संबधीत वरिष्ठांनी याकडे लक्ष देवून त्वरित आळा बसवावा अशी जनतेची मागणी आहे. प्रारंभी तालुक्यातील अवैध धंदे चोरी छुपे चालू होते.तेच व्यवसाय आता शहरात जागोजागी अधिकृत परवानगी मिळाल्यागत खूलेआम सूरू झाल्याचे पाहावयास मिळते आहे. कार्यवाहिच्या बडग्यातून सहिसलामत बाहेर पडण्यासाठी सदरील अवैध व्यवसायीकानी खाल पासून ते वर पर्यंत "मायाजाल " पसरवील्याने अद्याप ठोस कार्यवाही करण्यात आली नाही.मुख्यसुत्रधारास जेरबंद करण गरजेच असताना केवळ उद्दिष्टपूर्ती साठी नाममात्र कार्यवाही केली जाते.अशा प्रकाराने अवैध धंदेवाल्याचे मनोधैर्य वाढत आहे.शहरात मुख्य रस्त्यालगत जागोजागी खूलेआम मटकाबुक्कीत आकडे घेतले जात आहेत. दूसरीकडे गुटखा विक्री बंदी असतांना तालुक्यात मागेल तिथे गुटखा मिळतो आहे.ऊमरी आणि तामसा रस्त्यावर जुगाराचे अड्डे आहेत.सदरील व्यवसाय बंद करण्यात यावे यासाठी तक्रारी करूनही कूणीच दखल घेत नाही.



**वरीष्ठ अधिकारी चुपचाप :** तालुक्यात मटका, गुटखा, जुगार, अवैध वाहतूक, विनापरवाना देशी दारू विक्री, अवैद शिंदी विक्री, अवैध बारूदसाठा, स्फोटक मालाची साठवण आसे व्यवसाय बहरून आली आहेत .यावर अंकूश ठेवण्यासाठी शहरातअप्पर पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी, पोलीस निरीक्षकाची कार्यालय सुरु करण्यात आली आहेत .नांदेड येथील स्थानिक गुन्हा अन्वेषण विभाग सूध्दा आशा धंद्यांना "लगाम" लावू शकते . वरिष्ठ अधिकारी असूनसुद्धा शहरात विनापरवाना धंदे तेजीत आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे .

# कुणाल (दादा) मस्के यांचा हजारो कार्यकर्त्यांसोबत वंचित बहुजन आघाडीत प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**कळंब :** लॉयन्स कंपनीचे संस्थापक अध्यक्ष कुणाल दादा मस्के यांच्या सोबत पंचायत समितीचे माजी सभापती महादेव कांबळे यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी दि.१३रोजी वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश केला. यावेळी मनोगत व्यक्त करताना ॲड बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचितमध्ये प्रवेश करताना बहूजन दलित ओबीसी मुस्लिम समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेऊन बाळासाहेब आंबेडकर यांना साथ देण्याचे आश्वासन कुणाल दादा मस्के यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले. या कार्यक्रमासाठी मराठवाडा उपाध्यक्ष प्रविण (दादा) रणबागुल यांनी या देशात व महाराष्ट्रातील होत असलेल्या अन्याय अत्याचार विरोधात तसेच भाजप नेते आमदार यांनी पोलीस स्टेशन मध्ये गोळीबार तसेच मराठा समाजातील लोकांवर मराठा आरक्षण संदर्भातील मोर्चा वर गोळीबार व लाठीमाराचा निषेधार्थ तसेच महाराष्ट्र राज्यातील शासनकर्ते यांनी आपली जबाबदारी म्हणून गृहमंत्री व मुख्यमंत्री यांनी राजीनामा देणे योग्य आहे असे म्हणाले या हुकुमशाहीने महाराष्ट्र व संपुर्ण लोक अत्यंत भीतीने जगत आहेत असे वाटते या परिस्थितीला बदलायचे असेल तर बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील वंचित बहूजन आघाडीला सहकार्य करावे, असे आवाहन केले. जिल्हा प्रभारी मराठवाडा महासचिव ॲड. रमेश गायकवाड, जिल्हा प्रमुख बी. डी. शिंदे जिल्हा नेते अनिल हजारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले व प्रवेश करणाऱ्या सर्व कार्यकर्ते यांना शुभेच्छा दिल्या. युवक जिल्हा प्रमुख शितल चव्हाण,जिल्हा प्रवक्ते प्रा के टी गायकवाड,अरविंद खांडके,अरुण गरड,श्रीकांत राऊत, डि टी वाघमारे,शिवाजी कांबळे हे प्रमुख पाहुणे होते



यावेळी कुणाल(दादा)मस्के, सनी दादा मस्के, कळंब पंचायत समितीचे माजी सभापती कांबळे महादेव,आकाश गायकवाड, अमन भाई शेख, संदीप सोनवणे, कुंदन कदम, महेश गायकवाड, धनंजय ताटे, विक्की वाघमारे, वाजेद तांबोळी,अक्षय लांडगे, विश्वजीत मुंडे,समाधान बचूटे,आनंद कदम, शुभम गायकवाड, भाऊ सावंत, विशाल गाडे,यशवंत सेनेचे ज्ञानेश्वर लिके,अनिल शिंपले व ईतर असंख्य कार्यकर्ते यांनी यावेळी प्रवेश केला.




# जलयुक्त शिवारचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** राज्य शासनाच्यावतीने जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान 2.0 राबविण्यात येत असून शासनाचे महत्वकांक्षी अभियान आहे. या अभियानाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी आज वीस कलमी सभागृहात आढावा बैठक घेतली. तसेच सुधारित आराखडे असल्यास मंजुरीसाठी पाठविण्याच्या सूचना दिल्या. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, उपजिल्हाधिकारी (रोहयो) अजय चरडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, विभागीय वन अधिकारी प्रशांत खाडे, सहाय्यक वनसंरक्षक महेश चोपडे, राजुराचे उपविभागीय जलसंधारण अधिकारी पोहन बल्की, मूलचे तालुका कृषी अधिकारी प्रशांत कसराळे तसेच दूरदृष्टी प्रणालीद्वारे संबंधित तालुक्याचे उपविभागीय अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी विनय गौडा म्हणाले, संबधित उपविभागीय अधिकाऱ्यांनी तालुकास्तरावर आराखडे तपासावे, काही फेरबदल असल्यास सुधारीत आराखडे मंजुरीसाठी पाठवावेत. अतिंम आराखडा करतांना नियतव्यय बघून तसेच प्रत्येक विभागाच्या समन्वयातुन नियोजनबद्ध पदधतीने तयार करावा. तालुकानिहाय प्रत्येक कामांची यादी तयार करावी. पुर्णत्वास आलेली तसेच प्रगतीपथावर असलेल्या कामांची सद्यस्थिती तपासून सदर कामे पोर्टलवर अपडेट करावीत. तसेच प्रत्येक गावाचा आराखडा गटविकास अधिकाऱ्यांच्या मदतीने ग्रामसभेत ठेवून मंजूर करून घ्यावा. उपविभागीय अधिकाऱ्यांनी प्रत्येक विभागाशी समन्वय ठेवून आराखडा तयार करावा तसेच तालुकास्तरावर नियमित बैठका घेऊन सदर आराखडा सदस्य सचिवाच्या स्वाक्षरीने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्याकडे पाठवावा. त्यासोबतच, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळालेल्या कामांची कार्यवाही तसेच निधी वितरण तातडीने करण्याच्या सुचना संबधित यंत्रणांना दिल्या. यावेळी जिल्हाधिकारी गौडा यांनी विभागनिहाय एकूण मंजूर व प्रगतीपथावर असलेल्या कामांची सद्यस्थिती जाणून घेतली.

# गुन्ह्याच्या जनजागृतीसाठी 'सायबर जागृती यात्रा'

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** विदर्भातील शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि विद्यार्थिनी, तरुण वर्गामध्ये सायबर गुन्ह्याबाबत जनजागृती करण्यासाठी "सायबर जागृती यात्रेचे" आयोजन करण्यात आले आहे. सायबर गुन्ह्याबाबत माहिती उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सायबरचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या मार्गदर्शनात, सायबर जागृती यात्रेचे मुख्य संशोधक तथा सहाय्यक प्राध्यापक आणि स्थानांतर संरचनेचे निर्देशक डॉ. नवीन मुकेश पंजाबी यांच्या अध्यक्षतेमध्ये सायबर जागृती यात्रेचे आयोजन करण्यात आले. सदर पथक संशोधन व जागरूकता उपक्रमांतर्गत लघु संशोधन प्रकल्पाकरीता माहिती संकलित करण्यासाठी मणिभवन गांधी संग्रहालय, मुंबई येथून दि. 7 फेब्रुवारी रोजी सायबर जागृती यात्रेची सुरुवात करणार आहे. सदर सायबर जागृती यात्रा वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर, यवतमाळ, अकोला, वाशिम आणि बुलढाणा अशा 11 जिल्ह्यांना भेटी देऊन 17 फेब्रुवारी 2024 रोजी समारोप करणार आहे. सायबर जागृती यात्रेचे मुख्य संशोधक डॉ. नवीन पंजाबी संशोधक विद्यार्थ्यांच्या पथकासह चंद्रपूर येथे आल्याने पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक रीना जनबंधू यांच्या मार्गदर्शनात सायबर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस निरीक्षक रोशन यादव यांच्या नेतृत्वात शहरातील सरदार पटेल महाविद्यालय, जनता महाविद्यालय चंद्रपूर तसेच ज्ञानेश विद्यालय तथा महाविद्यालय,नवरगाव या ठिकाणी जाऊन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे व त्यास प्रतिबंध करण्याच्या उपाययोजनेसंदर्भात माहिती देण्यात आली. त्यासोबतच, मोबाईल तंत्रज्ञानाचा जपून वापर करणे, आर्थिक फसवणूक झाल्यास सायबर हेल्पलाइन 1930 डायल करणे, सायबर गुन्ह्यासाठी CYBERCRIME.GOV.IN या संकेतस्थळावर तसेच मोबाईल हरवल्यास CEIR.GOV.IN या संकेतस्थळावर कळवावे आदी सायबर गुन्हे सुरक्षिततेच्या उपाययोजनेबाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात आली. यावेळी सरदार पटेल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रमोद काटकर, जनता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. सुभाष, तसेच श्री ज्ञानेश विद्यालय तथा महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. सुरेश बाकरे आदी उपस्थित होते.



# द्वारकामाई वृद्धाश्रमात वयोवृद्धांना मिष्टान्न

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने शिवजयंती निमित्ताने स्वराज सप्ताह निमित्ताने शिर्डी शहरातील उद्योजक संदिप भिमाशंकर सोनवणे व सुनील सोनवणे यांच्या कुंटबाच्या वतीने लहान मुली सई हिच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शिर्डी येथील द्वारकामाई वृद्धाश्रमात मिष्टान्न भोजन वयोवृद्धांना देण्यात आले व त्याबरोबर वृध्दाश्रमसाठी काही मदत देखील देण्यात आली यावेळी बोलताना राष्ट्रवादीचे राहता तालुका अध्यक्ष संदिप सोनवणे म्हणाले ज्या वयोवृद्ध लोकांना कोणाचा आधार नाही त्याच्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सोनवणे कुंटबाच्या वतीने आर्थिक मदत व भोजन देऊन सामाजिक दायित्व जपण्यासाठी आमच्या कुटुंबातील सर्वांची भावना असल्याने हा उपक्रम घेतला असल्याचे सांगितले यावेळी साईची आरती करून कार्यक्रम सुरुवात करण्यात आली यावेळी रुपाली सोनवणे सोनाली सोनवणे कुमारी श्रीनिका सोनवणे सार्थक सोनवणे सृष्टी सोनवणे सचिन तुरकणे आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.

# परीक्षेतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्ह्यात आठ भरारी पथकांची नेमणूक

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक (इयत्ता 12 वी) परीक्षा 21 फेब्रुवारी ते 19 मार्च 2024 तर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता 10) परीक्षा 1 मार्च ते 26 मार्च 2024 या कालावधीत होणार आहे. सदर परीक्षा तणावमुक्त वातावरणात होण्यासाठी तसेच परीक्षेतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्ह्यात एकूण 8 भरारी पथके स्थापन करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी जिल्हास्तरीय दक्षता समितीचा आढावा घेतला. वीस कलमी सभागृह (जिल्हाधिकारी कार्यालय) येथे आयोजित या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधिक्षक रिना जनबंधू, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. महादेव चिंचोळे, शिक्षणाधिकारी (माध्य.) कल्पना चव्हाण, शिक्षणाधिकारी (प्राथ.) राजकुमार हिवारे, विस्तार अधिकारी (शिक्षण) सावन चालखुरे आदी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, परिक्षेच्या काळात जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिका-यांनी परीक्षा केंद्रांना भेटी द्याव्यात. तसेच संवेदनशील परीक्षा केंद्रावर जास्त बंदोबस्त ठेवावा. परिक्षेच्या पहिल्या दिवसापासूनच गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शिक्षण विभाग तसेच पोलिस विभागाने सुक्ष्म नियोजन करावे. महत्वाचे तसेच इतर पेपरवेळी भरारी पथकांनी परीक्षा केंद्रांना भेटी देऊन तपासणी करावी, अशा सुचना जिल्हाधिका-यांनी केल्या. असे आहेत भरारी पथक : परिक्षेतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या भरारी पथकामध्ये शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचे भरारी पथक, शिक्षणाधिकारी (योजना) यांचे पथक, शिक्षणाधिकारी (प्राथ), उपशिक्षणाधिकारी (माध्य.), महिला अधिकारी वर्ग – 1 यांचे पथक, तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांचे विशेष भरारी पथक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे ज्येष्ठ अधिष्ठाता यांचे विशेष भरारी पथक आणि नागपूर येथील प्रादेशिक विद्या प्राधिकरण उपसंचालक यांच्या कार्यालयातील वर्ग 1 व 2 चे विशेष भरारी पथक यांचा समावेश आहे. जिल्ह्यातील परीक्षा केंद्र व विद्यार्थ्यांची संख्या : इयत्ता 12 वी करीता जिल्ह्यात एकूण 86 परीक्षा केंद्र असून एकुण विद्यार्थी संख्या 28733 आहे. तर इयत्ता 10 वी करीता परीक्षा केंद्रांची संख्या 124 आणि विद्यार्थी संख्या 28266 आहे. जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय दक्षता समिती : जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय दक्षता समिती स्थापन करण्यात आली असून इतर सदस्यांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलिस अधिक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी (प्राथ.) शिक्षणाधिकारी (योजना) यांचा समावेश आहे. तर शिक्षणाधिकारी (माध्य.) हे समितीचे सदस्य सचिव आहेत. तालुकास्तरीय दक्षता समितीचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी असून इतर सदस्यांमध्ये तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, संबंधित पोलिस निरीक्षक असून गटशिक्षणाधिकारी हे सदस्य सचिव आहेत.



# मुलांवर बालवयातच धार्मिक संस्काराचे बीज रुजवा; जे.बी. पाटील यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** महामना लॉन्स येथे11 फेब्रुवारी रोजी एक दिवसीय मराठवाडा विभागीय पाठशाळांचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले या स्नेहसंमेलनात मराठवाडा व विदर्भातील 45 पाठशाळातील आठ ते 14 वयोगटातील जवळपास 425 विद्यार्थी विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.यावेळी मराठवाडा विभागीय पाठशाळांचे प्रमुख जे बी पाटील यांनी उपस्थिताना मार्गदर्शन करताना सांगितले की बाल वयातच मुलावर जैन धर्माच्या संस्काराचे बीज रुजवण्यासाठी पाठशाळांचे निर्माण करण्यात आले. या वयातच त्यांना संपूर्ण जैन धर्माची, जैन तिर्थंकारांची जैन मुनिंची व धार्मिक कार्यक्रमाची माहिती होणे आवश्यक असल्याने पाठशांळाच्या माध्यमातुन दररोज एक तास त्यांना शिक्षण दिल्या जाते, यासाठी दरवर्षी पाठशाळांचे स्नेहसंमेलन आयोजित करण्यात येत असतात या बालाजी महाराजांच्या पुण्यनगरीमध्ये संपन्न होत असलेल्या या वार्षिक स्नेहसंमेलनामुळे या शहराचे नाव सर्व दूरपर्यंत पोहोचले आहे भविष्यात पाठशाळांच्या माध्यमातून अधिका अधिक जैन समाजाचे विद्यार्थी विद्यार्थिनी यांना याचा लाभ मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात दिगंबर जैन समाजाचे वतीने फार मोठ्या प्रमाणात ठीक ठिकाणी पाठशाळा सुरू करण्यात आलेले आहेत. गेल्या नऊ वर्षापासून भगवान महावीर आचार्य कुंदकुंद दिगंबर जैन स्वाध्याय मंदिर ट्रस्ट देऊळगाव राजाचे वतीने नियमितपणे पाठशाळा भरविल्या जाते.यामध्ये शहरातील बालके सहभाग नोंदवून धर्माचा अभ्यास करीत आहेत. याच कार्यक्रमात छत्रपती संभाजी नगर येथिल धर्मणुरागी चंद्रकांत साहूजी यांना 28 वर्ष यशस्वी पणे पाठशाळा चालविल्याबद्धल जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाच्या वतीने शेवटी सहभागी विद्यार्थ्यांना शिक्षक शिक्षीकांना बक्षीस वितरण करण्यात आले. भगवान महावीर आचार्य कुंदकुंद दिगंबर जैन स्वाध्याय मंदिर ट्रस्टच्या सर्व संचालकांनी अथक परिश्रम घेतले तर सूत्रसंचालन या ट्रस्टचे मयुर जैन यांनी तर आभार मनीष कोठेकर यांनी मानले.

# १८ फेब्रुवारीपासून झाडीपट्टी सांस्कृतिक महामहोत्सव

## मूल येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मांदियाळी

आधुनिक केसरी न्यूज

**मूल :** महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक विभागाच्या अंतर्गत सांस्कृतिक कार्य महासंचालनालय मुंबई व जिल्हा प्रशासन चंद्रपूर यांच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या नेतृत्वात व चंद्रपूर जिल्हा भाजपा अध्यक्ष हरीश शर्मा यांच्या मार्गदर्शनात मूल येथे १८, १९ व २० फेब्रुवारी रोजी झाडीपट्टी सांस्कृतिक महामहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवसात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची मांदियाळी रंगणार आहे. झाडीपट्टीतील चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील झाडीपट्टी कलाकार यात भाग घेणार आहेत. सुधीर मुनगंटीवार यांच्या सुयोग्य नेतृत्वात व मार्गदर्शनात हा झाडीपट्टी महोत्सव पार पडणार आहे. झाडीपट्टीतील ज्येष्ठ कलावंत पद्मश्री डॉ. परशुराम खुणे यांच्या मार्गदर्शनात व नाट्य कलावंत सदानंद बोरकर, देवेंद्र दोडके, मुकेश गेडाम, शेखर डोंगरे, अनिरुद्ध वनकर, युवराज प्रधान, युवराज गोंगले, अरविंद झाडे यांच्या सहकार्याने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी कला रसिकांना मिळणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या झाडीपट्टी महामहोत्सवात नाटक, दंडार, खडीगंमत, रेला नृत्य, आदिवासी नृत्य, कीर्तन, भुलाबाईची गाणी, रोवण्याची गाणी, महादेवाची गाणी, डहाका, संबळ, सुमधुर सुगम संगीत आदी कार्यक्रम या महोत्सवात सादर केले जाणार आहेत. १९ फेब्रुवारीला शिवजयंतीच्या पर्वावर मूल शहरातून रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत सुधीर मुनगंटीवार यांच्यासह सिने कलावंत, सिने अभिनेत्री आदी सहभागी होणार आहेत. रॅलीत विविध देखावे सादर केले जाणार आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या सांस्कृतिक महोत्सवाचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मूल येथील झाडीपट्टी सांस्कृतिक महामहोत्सव समितीने केले आहे.

## भुतेकरांना पोलिसांनी घेतले ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज



**देऊळगाव राजा :** अवैध वाळूवर पूर्णतः प्रतिबंध घाला या मागणीसाठी मंत्रालयात आत्मदहनाचा इशारा देणाऱ्या संतोष भुतेकर यांना पोलिसांनी समृद्धी महामार्गावर ताब्यात घेतले.दरम्यान अवैध वाळू वर पूर्णतः बंदी घालू अशा लेखी आश्वासनानंतर त्यांनी आंदोलन तूर्तास मागे घेतले. अवैध वाळू पूर्णतः बंद करा या मागणीसाठी इसरूळ येथील माजी सरपंच तथा युवा सेनेचे नेते संतोष भुतेकर यांनी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे दालन अथवा मंत्रालय परिसरात आत्मदहनाचा इशारा दिला होता, दरम्यान भूमिगत झालेले भुतेकर मुंबईकडे निघाले असता समृद्धी महामार्गावर अंढेरा पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. आपल्या मागणीसाठी भुतेकर यांनी ठाण्यातच उपोषणाला बसण्याची भूमिका घेतली असता उपविभागीय अधिकारी समाधान गायकवाड यांनी अवैध वाळू माफियांना आवर घालून होणारी अवैध वाळू वाहतूक पूर्णतः बंद करू वाळू उपसा करणाऱ्या बोटी नष्ट करू असे लेखी आश्वासन दिले असता भुतेकर यांनी आपले आंदोलन तूर्तास मागे घेतले. दरम्यान महसूल विभागाने अवैध वाळू उपसा करणारी एक बोट नष्ट केली असून वृत्तलिहीपर्यंत प्रशासनाची मोहीम सुरू होती.

## ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांना 'एआयटी'च्या वतीने जीवनगौरव पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** दिघी येथील आर्मी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या (एआयटी) ३० व्या स्थापना दिनानिमित्त दिला जाणारा जीवनगौरव पुरस्कार भारतीय अणुऊर्जा मंडळाचे अध्यक्ष, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांना, तर यशस्वी युवा उद्योजक पुरस्कार एआयटीच्या २००२ बॅचचे माजी विद्यार्थी अंकुश तिवारी यांना जाहीर झाला आहे.



कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंगचे कमांडंट लेफ्ट. जनरल ए. के. रमेश यांच्या हस्ते सोमवार, दि. १९ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी १० वाजता, दिघी येथील एआयटीच्या कॅम्पसमध्ये या पुरस्कारांचे वितरण होईल, अशी माहिती 'एआयटी'चे संचालक ब्रिगेडियर (निवृत्त) अभय भट यांनी दिली. या सोहळ्यात महाविद्यालयातील 'उत्कृष्ट विद्यार्थी', प्रत्येक शाखेतील उत्कृष्ट विद्यार्थिनी, उत्कृष्ट खेळाडू, उत्कृष्ट शिक्षक, सर्वोत्तम इनोव्हेशन आदी पारितोषिक देऊन विद्यार्थ्यांचा गौरव केला जाणार आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे, असेही ब्रिगेडियर भट यांनी नमूद केले.
१९९४ मध्ये तत्कालीन लष्करप्रमुख जनरल बी.सी. जोशी, पीव्हीएसएम एव्हीएसएम, एडीसी यांच्या काळात झाली. संगणक अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार अभियांत्रिकी आणि मेकॅनिकल अभियांत्रिकी या तीन अभियांत्रिकी शाखांसह सुरु झालेल्या 'एआयटी'मध्ये माहिती तंत्रज्ञान शाखेची भर पडली असून, प्रत्येकी १२० विद्यार्थी क्षमता आहे. २०२३ पासून मास्टर ऑफ इंजिनियरिंग (डेटा सायन्स) अभ्यासक्रम सुरू केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या 'एआयटी'च्या सर्व शाखा 'एनबीए' मान्यताप्राप्त असून, 'नॅक' श्रेणीप्राप्त आहे.
'एआयटी'चे संचालक ब्रिगेडियर (निवृत्त) अभय भट्ट यांच्या नेतृत्वाखाली, प्राचार्य डॉ. बी. पी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सैन्यदलातील कर्मचाऱ्यांच्या मुलांना जागतिक दर्जाचे शिक्षण आणि संशोधन सुविधा प्रदान केले जात आहे.
उत्कृष्टता, प्रामाणिकता, सचोटी, सांघिक कार्य, सातत्यपूर्ण शिक्षण आणि नाविन्य यासारख्या मूलभूत मूल्यांवर 'एआयटी' भर देते. 'एआयटी'चा पर्यावरणपूरक कॅम्पस ३० एकरमध्ये व्यापलेला आहे. शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, इनोव्हेशन व अन्य अवांतर उपक्रमांसाठी विविध क्लब येथे आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक औद्योगिक, शैक्षणिक व संशोधन संस्थांशी 'एआयटी' संलग्नित असून, प्लेसमेंट्च्या बाबतीत सक्षम आहे. मायक्रोसॉफ्ट, अमेझॉन, गुगल, ड्रीमप्लग टेक्नॉलॉजीज अशा अनेक कंपन्यामध्ये विद्यार्थी कार्यरत आहेत. सर्वाधिक एक कोटी बारा लाखाचे पॅकेज 'एआयटी'च्या विद्यार्थ्याला मिळालेले असून, गेल्या तीन वर्षात प्लेसमेंट झालेल्या विद्यार्थ्यांचे सरासरी वेतन १४ लाख रुपये आहे. अनेक विद्यार्थ्यांनी स्टार्टअप्स, उद्योग सुरु केले आहेत, असे ब्रिगेडियर भट यांनी नमूद केले.

## पैशाच्या कारणावरून चाकू हल्ला

### महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** उधारीच्या पैशाचे कारणावरून चाकू मारून एकास जखमी केल्याची घटना आज (ता.१३)हॉटेल वीरा नजीक बायपास टी पॉइंट वर घडली. पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविला.
याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार शहरातील मेडिकल व्यवसायिक सचिन नागरे यांच्या मित्राने घेतलेल्या उधारीच्या पैशावरून वाद झाला. यातील आरोपी क्रमांक दोन व तीन यांनी फिर्यादीस झटापट करून शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. तर आरोपी क्रमांक एक याने फिर्यादीचे डावे हाताचे कोपराजवळ चाकू मारून जखमी केले. सचिन सुनील नागरे वय ३० रा.दे मही यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी कैलास भोसले, नीलम भोसले,व रामचंद्र पवार सर्व राहणार अंढेरा या तिघांनी विरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. सहाय्यक फौजदार प्रदीप गुंजकर तपास करीत आहे.




## जैन कासार समाजाच्या तीळगुळ मेळाव्यात गुणीजणांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सोलापूर :** जैन कासार विकास प्रतिष्ठानच्या वतीने जैन कासार मंदिरात तिळगूळ स्नेहमेळावा कार्यक्रम झाला. यावेळी समाजातील गुणीजणांचा सत्कार, गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण व 'जैन कासार समाचार' मासिकाचे प्रकाशन हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दिगंबर जैन कासार समाज संस्थेचे शिष्यवृत्तीप्रमुख प्राचार्य अशोक साळवी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष व भाजपचे ज्येष्ठ नेते मोहन डांगरे उपस्थित होते. यावेळी प्रमुख व्याख्याते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य साहित्यिक प्रा.धन्यकुमार बिराजदार उपस्थित होते. व्यासपीठावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष हुकुमचंद हेसे, उपाध्यक्षा माणिक व्यवहारे, सुभाषचंद्र वनकुद्रे यांची उपस्थिती होती.
प्रारंभी रूपाली भस्मे यांनी णमोकार मंत्र म्हटले. पाहुण्यांच्या हस्ते भ.महावीरांच्या प्रतिमाचे पूजन झाले. अध्यक्ष हुकुमचंद हेसे यांनी पाहुण्यांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. यावेळी बोलताना प्राचार्य अशोक साळवी म्हणाले, समाजाने शैक्षणिक, उद्योग क्षेत्रात यश संपादन करावे. आपला विकास साधत असताना समाज व राष्ट्राच्या विकासासाठी योगदान द्यावे असे मत व्यक्त केले. प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी मकर संक्रांतीचे भौगोलिक महत्त्व विषद करीत कुरु वंशाच्या रक्षणासाठी कटिबद्ध भीष्म, शंकरानी केलेले गोसव यज्ञ, भरत चक्रवर्ती यांनी सूर्यात पाहिलेल्या अकृत्रिम जिनालयाची उदाहरणे देत तिळगुळाचे ऐतिहासिक महत्त्व विषद केले. समाजात राहूनच व्यक्तीचा बहुमुखी विकास शक्य आहे. समाजात राहूनच चारही पुरुषार्थ प्राप्त करत असल्याने प्रत्येकाने समाज व राष्ट्रहितासाठी प्रयत्न करावा असे मत व्यक्त केले. मोहन डांगरे यांनी अध्यक्षीय मनोगतामध्ये कासार समाज हा देशाच्या सौभाग्याचं लेणं असून मदतीसाठी सदैव तत्पर असणारा समाज आहे. आईचं महत्त्व सांगतांना त्यांनी यशस्वी पुरुष घडविण्यात आईचं खूप मोठं योगदान असतं. त्यामुळे यशस्वी पुरुषांचा उल्लेख होताना वडिलापेक्षा नेहमी आईचा दाखला दिला जातो, असे उदाहरणासह सांगितले.
दहावी-बारावीमध्ये शहरामधून प्रथम, द्वितीय, तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. यावेळी संजय कंदले, कांतीलाल नळे, अॅड.नीता मंकणी, भारतभूषण मैंदर्गे, बाबुराव तंगा, उमेश सगरशेट्टी, राजू सासवडे, सचिन पाटील यांची उपस्थिती होते. विनायक टोणगे यांनी आभार मानले. गीता मोहोळकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. विलास हरपाळे (शासकीय राज्य होमिओपॅथी परिषदेच्या सल्लागारपदी निवड), भारतभूषण मैंदर्गे (शैक्षणिक फंडाचे देणगीदार), सुनिता भस्मे (राज्य कथाकथन स्पर्धेत प्रथम) , प्रिया श्याम पाटील (ब्रह्मदेवदादा माने बँकेच्या संचालकपदी निवड), अॅड.प्रेम सुरेश मंकणी (सुप्रिम कोर्टातील विधिज्ञ) पुरस्कारप्राप्त संजय गडदे, आदर्श शिक्षक अभिनंदन विभुते यांचा सत्कार करण्यात आला.

## वामन बाळकृष्ण कुबेर यांचे पुदुचेरी येथे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सौर ऊर्जा विषयातील तज्ज्ञ वामन बाळकृष्ण कुबेर यांचे काल १२ फेब्रुवारीला पुदुचेरी येथे निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. संघाचे जेष्ठ प्रचारक आणि कल्याण आश्रमाचे अ. भा. हित रक्षा प्रमुख श्री गिरीश कुबेर यांचे ते बंधू होत. पर्यटनानिमित्त पुदुचेरी येथे गेले असता वामन कुबेर यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यातच त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, पत्नी, दोन बंधू असा परिवार आहे. त्यांच्यावर उद्या बुधवारी १४ फेब्रुवारीला पुणे येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील. सोलर सिस्टिम सोल्युशन्स या कंपनीचे



कुबेर हे संस्थापक आणि कार्यकारी संचालक होते. अनेक वर्षे ते आय. आय. टी. मुंबईत फोटोवेल्टानिक या विषयाशी संबंधित संस्थेवर सल्लागार म्हणून देखील त्यांनी काम पाहिले होते. अनेक वर्ष ते सौर ऊर्जा क्षेत्राशी संबंधित कामासाठी ऑस्ट्रेलियामध्ये देखील कार्यरत होते. सध्या त्यांचे वास्तव्य पुण्यात होते. संघाचे जेष्ठ प्रचारक श्री. गिरीश कुबेर यांचे ते मोठे बंधू होत.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# पाणीटंचाई निर्मूलनासाठी बाबासाहेब शेळकेंचा पुढाकार

## डोमगाव ग्रामस्थांसाठी स्वखर्चाने बोअरवेल घेऊन केला सार्वजनिक विहिरीला पाणी पुरवठा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** हागणदारीमुक्ती, दारूबंदीसाठी पुढाकार घेणारे बाबासाहेब शेळके यांनी डोमगावच्या पाणी टंचाई निर्मूलनासाठीही पुढाकार घेतला असून स्वखर्चाने त्यांनी वाढीव बोअरवेल घेऊन शिवाय विद्युत पंप बसवून सार्वजनिक विहिरीला पाणी पुरवठा केला आहे. अंबड तालुक्यातील डोमगाव ग्रामपंचायतमध्ये पाणी पुरवठा कर्मचारी म्हणून कार्यरत असलेले बाबासाहेब शेळके यांनी पत्नी सविता शेळके यांच्या मदतीने स्वखर्चाने गावात २२५ शौचालय बांधून दिली आहेत. वृक्षारोपण तसेच नर्सरी विकसित करून ते मोफत रोपेही वाटतात. गावात दारूबंदी व्हावी, यासाठी शेळके यांनी पुढाकार घेतला होता. शेवटी २४ जानेवारी रोजी ग्रामसभेत दारुबंदीचा ठराव पारित करण्यात आला. डोमगाव हे सतत पाणी टंचाईचा सामना करणारे गाव म्हणून ओळखले जाते. या गावात गतवर्षीही टँकरने पाणी पुरवठा होत होता. गावातील पाणी टंचाई निर्मूलनासाठी जल जीवन मिशन भूजल सर्वेक्षण यंत्रणेने डोमेगावला पाणी पुरवठा करणाऱ्या विहिरीजवळ गलाठी नदीमध्ये ८ बोअरवेल घेतले होते. मात्र ते कमी खोलीचे असल्याने अपेक्षित असे पाणी मिळत नव्हते. बाबासाहेब शेळके यांनी भूजल सर्वेक्षण यंत्रणेने घेतलेल्या एका बोअरवेलवर स्वखर्चाने वाढीव बोअरवेल घेतले. शिवाय विद्युत पंप बसवून ते पाणी गावातील सार्वजनिक विहीरीत सोडले.यामुळे विहिरीला दिवस आणि रात्र दिवसाकाठी सात ते आठ फूट पाणी येत आहे. विहीरीत पाणी असल्याने यंदा डोमगावात पाणी टंचाई भासणार नसल्याचे ग्रामपंचायतीचे म्हणणे आहे. एकंदरीत बाबासाहेब शेळके यांनी घेतलेल्या पुढाकाराने डोमगावात यंदा पाणी टंचाई भासणार नाही, शेळके यांच्या या उपक्रमाचे गावकरी कौतुक करीत आहेत. बाबासाहेब शेळके व त्यांच्या पत्नी सौ सविता शेळके यांनी पदरमोड करून समाज हिताचे उपक्रम राबवित आहेत, याबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासनस्तरावर दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.



# स्पार्क युवा नेतृत्व प्रशिक्षण शिबिराचा समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** स्पार्क जनविकास फाउंडेशन प्रणित युवा स्पार्कच्या वतीने ताडोबातील आगरझरी येथे आयोजित चार दिवसीय निवासी शिबिराचा समारोप नुकताच पार पडला.

युवा स्पार्कची नव्याने जबाबदारी सोपविण्यात आलेल्या शिबिरातील विद्यार्थ्यांनाच समारोपीय कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मान देण्यात आला. नव्याने जबाबदारी सोपविण्यात आलेल्या युवा स्पार्कच्या विदर्भ संयोजिका राधिका दोरखंडे, विदर्भ सहसंयोजक क्रांतिवीर सिडाम, चंद्रपूर जिल्हा संयोजक दर्शन मेश्राम, जिल्हा सहसंयोजिका नीकिता ठाकरे, गडचिरोली जिल्हा संयोजक प्रीतम बनकर मंचावर उपस्थित होते. शिवाजी महाविद्यालयाचे उपप्राचार्य राजेश खेरानी, मुक्त पत्रकार अविनाश पोइनकर, ॲड. दीपक चटप, आगरझरी निवासी संकुलाचे व्यवस्थापक अजय कोडापे यांचीही प्रामुख्याने उपस्थिती होती.

सहभागी विद्यार्थ्यांनी यावेळी अनुभव कथन केले. सर्व विद्यार्थ्यांना युवा स्पार्कच्या वतीने प्रमाणपत्र आणि मेडलने सन्मानित करण्यात आले. वादविवाद स्पर्धेतील विजेते आशीष कारेवार, रोहित मेश्राम, शताक्षी खाडे यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या चार दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिरात विविध मान्यवरांनी व्यक्तिमत्त्व विकास, युवा नेतृत्व, सामाजिक कार्य आदी विषयांवर बौद्धिक मार्गदर्शन केले. प्राचार्य जयश्री कापसे गावंडे, वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थिपे, प्रा. दिलीप सोळंके, ज्येष्ठ दिग्दर्शक हरीश इथापे, आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अविनाश जाधव, शिवाजी महाविद्यालय राजुराचे प्राचार्य डॉ. एस. एम. वरकड, उपप्राचार्य आर. आर. खेरानी, राष्ट्रीय पुरस्कार विजेते डॉ. पवन नाईक, राज्य पुरस्कार प्राप्त प्रा. गुरुदास बल्की, नैसर्गिक पर्यावरण आणि मानवता विकासचे राज्य अध्यक्ष बादल बेले, जिल्हा अध्यक्ष बबलू चव्हाण, कोरपना येथील स्कॉलर्स अकॅडमीचे संचालक दिलीप झाडे, धनंजय तावाडे, संजय वैद्य, पक्षीमित्र सुमेध वाघमारे, इको प्रो चे अध्यक्ष बंडू धोतरे, ॲड. दीपक चटप, मुक्त पत्रकार अविनाश पोईनकर आदीचा मार्गदर्शकांमध्ये समावेश होता. शिबिरा दरम्यान विविध विषयांवर समूह चर्चा घेण्यात आली. सामाजिक विषयांवर विद्यार्थ्यांनी आगरझरी गावात पथनाट्य सादर केले. गावातील रस्त्यावरील प्लास्टिक कचरा उचलून परिसर स्वच्छता केली. गावकऱ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले. गावातील मुलामुलीनीही यात आपल्या कला सादर केल्या. शिबिराच्या यशस्वीतेसाठी स्पार्क जनविकास फाउंडेशनचे सर्व सदस्य, युवा स्पार्कच्या सर्व सदस्यांनी सहकार्य केले.




# धम्म परिषदेतूनही 'इव्हिएम हटाव संविधान बचाव' चा नारा

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राची धम्मदान व धम्मसंदेश यात्रा सर्व जिल्हा व शेजारील जिल्ह्यातील अनेक ठिकाणी आयोजित करण्यात येत आहे. या यात्रेस भरभरून प्रतिसाद मिळत असून बौद्ध उपासक उपासिकांकडून भिख्खू संघाचे जोरदार स्वागत होत आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या तेराव्या जागतिक बौद्ध धम्म परिषदेत येथील



अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा धम्मगुरू संघनायक भदंत पंय्याबोधी थेरो यांनी 'इव्हिएम हटाव - संविधान बचाव' चा नारा दिला. यावेळी झेन मास्टर सुदस्सन, भंते शिलभद्र, भंते सुमेध, भंते सुगत, भंते शिलधम्मो, भंते संघदीप, भंते शिलानंद, भंते संघशिल, भंते सुनंद, भंते सुप्रिय आदींची उपस्थिती होती.

धम्मदेसना देतांना भदंत पंय्याबोधी थेरो म्हणाले की, देशभरात होणाऱ्या निवडणूका या प्रामुख्याने इव्हिएमवर घेतल्या जातात. परंतु लोकांचा इव्हिएमवर विश्वास राहिलेला नाही. आपण बजावलेल्या मताधिकारावर गदा येत असल्याची लोकांमध्ये भावना आहे. यामुळे संविधानाच्या तत्वांची पायमल्ली होत आहे. हे लोकशाहीसाठी धोक्याची घंटा आहे. परभणी जिल्ह्यातील पूर्णा येथे भरलेल्या २१ व्या धम्म परिषदेतही पंय्याबोधी यांनी उपदेश केला. या देशातील सरकार इव्हिएमचा गैरवापर करून देशात हुकुमशाही आणण्याच्या तयारीत आहे. यामुळे भारतीय संविधान धोक्यात येत आहे. देशभरातील संविधाननिष्ठ आंबेडकरी अनुयायांनी एकत्र येत येणाऱ्या निवडणुकांत इव्हिएम हटाव संविधान बचाव हा नारा देत सज्ज रहावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# उद्योजकाने ग्राहकाची मानसिकता ओळखणे गरजेचे : डॉ. नितीन मोटे

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** जिल्हा शिक्षण मंडळाचे शंकरराव भेलके महाविद्यालयात आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाच्या वतीने आयोजित 'रोजगार आणि उद्योजकता' या कार्यशाळेत विविध उद्योजकांच्या जीवनाचा उत्कर्षाचे दाखले देत डॉ. नितीन मोटे यांनी विद्यार्थ्यांनी उद्योग क्षेत्रामध्ये आपले नाव मोठे करावे असे आवाहन केले. धीरूभाई अंबानी, रतन टाटा,हनुमंतराव गायकवाड अशा यशस्वी उद्योजकांच्या यशोगाथा त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडल्या. त्याचबरोबर यशस्वी व्हायचे असेल तर जिद्द, चिकाटी, अविरतपणे कष्ट करण्याची तयारी हवी असेही प्रतिपादन केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यातून विद्यार्थ्यांना व्यवसायासाठी प्रेरणा मिळेल महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपण उत्कर्ष साधावा असेही त्यांनी म्हटले.

तसेच उद्योजक मा. राजेश पवार यांनी विद्यार्थ्यांनी उद्योजकाची मानसिकता तयार केली पाहिजे, ती काळाची गरज आहे. तसेच काम करताना कोणताही संकोच करू नये. त्याचबरोबर उद्योगात सातत्य, धोका पत्करण्याची तयारी, अपयशाने खचून जाऊ नये, आत्मविश्वास बाळगावा अशा सर्व गोष्टी त्यांनी आपल्या मनोगतून व्यक्त केल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तुषार शितोळे यांनी विद्यार्थ्यांना कष्टाशिवाय पर्याय नाही, याची जाणीव करून देताना त्यांनी वेगवेगळे उदाहरणे दिली. तसेच उद्योजकांच्या आत्मचरित्राचा अभ्यास केल्यास त्यांचा संघर्ष आपल्यासाठी प्रेरणादायी ठरेल असे म्हटले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आजीवन अध्ययन विभागाचे विभाग प्रमुख प्रा. संदीप लांडगे यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा.प्रल्हाद ननवरे आणि प्रा.आभार ऋतुजा साळुंखे यांनी मानले. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा.संदीप लांडगे, डॉ.हिमालय सकट, प्रा.पौर्णिमा कारळे, डॉ.जगदीश शेवते, प्रा.प्रल्हाद ननावरे, प्रा.कोमल पोमण,प्रा. प्राजक्ता कापरे प्रा.माऊली कोंडे, प्रा.दयानंद जाधवर, प्रा.महेश कोळपे, प्रा. जीवन गायकवाड, प्रा.ऋतुजा साळुंके, श्री.धनाजी माने, श्री. अभिजित मोरे, मनीषा मोहिते यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.तुषार शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली केले.



शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा
सुका मेवा
मसाले
क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू
स्टीलच्या वस्तू
ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे
साफ सफाईचे सर्व साहित्य
आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर